महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१८ / आषाढ १९, १९४० (शके)

(१)	**आदिवासी विकास मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**उद्योग, खनिकर्म मंत्री**	
(३)	**ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**	
(४)	**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**	
(५)	**सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ६४

मुंबई जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

(१) * ४१३७८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१७८ ला दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या गैरव्यवहाराची आर्थिक व प्रशासकीय चौकशी करणेकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करणेकरीता सहाय्यक निबंधक श्री.व्ही.एम.गवळी यांची चौकशी अधिकारी म्हणून दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजीच्या आदेशान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था के-पुर्व विभाग, मुंबई यांनी नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच सदर चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, त्यानुसार काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सहा महिन्यांचा कालावधी होऊनही कारवाई होण्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्याकरीता दिनांक ३०/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून संबंधित अपचारींच्या चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान कर्जमाफी योजना सुरु करण्यात आल्याबाबत

(२) * ४१३०१ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयंत पाटील, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान कर्जमाफी योजना सुरु करण्यात आली असून या योजनेंतर्गत जिल्हानिहाय शेतकऱ्यांची संख्या व त्यांना वाटप केलेल्या कर्जाच्या रकमेबाबतची माहिती शासनाच्या संकेत स्थळावर दर्शविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्जमाफीसाठी ग्रीन, यलो आणि व्हाईट यादी शासनाने जाहीर केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील ३५ हजार शेतकऱ्यांच्या यादीत काही त्रुटी आढळल्यामुळे त्या दुरुस्त करुन पुन्हा जिल्हा बँकेकडून सदर यादी शासनाकडे पाठविण्यात आलेली असून ती यादी शासनाच्या पोर्टलवर दिसतच नसल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील ३५ हजार शेतकऱ्यांची नावे यादीतून गायब झाल्यामुळे सदर कर्जमाफी योजनेपासून शेतकरी वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना लागू झाल्यानंतर व या योजनेचा विस्तार केल्यानंतरही सुमारे १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन राज्यात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरुच असून जाचक अटींमुळे व सदोष कार्यपध्दतीमुळे अनेक शेतकरी या कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिले तर राष्ट्रीयकृत बँकांकडील ग्रीनलिस्टमध्ये अनेक उणिवा असल्यामुळे काही जिल्ह्यात कर्जमाफी होऊनही अनेक शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज उपलब्ध झालेले नसून सद्य:स्थितीत कर्जमाफी योजनेचा पुनर्विचार करुन सरसकट कर्जमाफीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) सर्व मा.आमदारांना विधानसभेमध्ये/ विधानपरिषदेमध्ये ही माहिती पुरविण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे, व्हाईट यादी जाहिर केलेली नसून पात्र लाभार्थ्यांसाठी ग्रीन यादी जाहिर करण्यात येते. अधिक तपासणी आवश्यक असलेल्या प्रकरणांचा यलो यादीत समावेश करण्यात येतो.

(३) नाही.

(४) व (५) कर्जमाफी योजना कर्जात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी असून ही योजना लागू झाल्यानंतर झालेल्या आत्महत्यांशी त्यांचा संबंध जोडता येणार नाही. सदर योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना

लाभ देण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरू असून कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. त्यामुळे योजनेचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सन २०१६ च्या खरीप हंगामामध्ये तूरीच्या मुबलक उत्पादनाबाबत

(३) * ४१२२३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६ च्या खरीप हंगामात तूरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाल्याने नाफेडमार्फत तूर खरेदीचा निर्णय शासनाने घेऊन भरडाई केलेली तूर स्वस्त धान्य दुकानामार्फत रुपये ५५ प्रती किलो या दराने विक्रीस ठेवली असतांनाही त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गोदामे भरडाई न केलेल्या तूरीने व्यापली असल्यामुळे चालू हंगामात तूर खरेदी मंदगतीने सुरु असल्याने भरडाई केलेली तूर स्वस्त धान्य दुकानातून रुपये ३० ते ३५ प्रती किलो या दराने विक्रीस ठेवावी अशा प्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) व (३) हंगाम २०१६-२०१७ मध्ये तूरीच्या मुबलक उत्पादनाच्या पार्श्वभुमीवर केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये खरेदी केलेल्या तूरीने राज्यातील गोदामे पूर्णपणे भरलेली होती. तथापि, हंगाम २०१७-१८ मधील खरेदीसाठी अतिरिक्त २११ गोदामे भाडे तत्वावर घेऊन साठवणूकीची व्यवस्था केली आहे.

राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत खरेदी केलेल्या तूरीची भरडाई करुन केलेली तूरडाळ स्वस्त धान्य दुकानातून रुपये ३५/- प्रति किलोप्रमाणे विक्री करण्यास दिनांक ०९/०६/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी पंप वीज जोडणीच्या कामासाठी निविदा भरण्यास एकही कंत्राटदार तयार नसल्याबाबत

(४) * **४२४८५ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या अधिकाऱ्यांनी बाजारभावाचा कुठलाही विचार न करता कृषी पंप वीज जोडणीच्या कामासाठी काढलेल्या निविदा भरण्यास एकही कंत्राटदार तयार नसल्यामुळे पूर्व विदर्भासाठी रूपये ३५० कोटी उपलब्ध असताना ऊर्जामंत्र्यांनी मागेल त्याला जोडणी देण्याची केलेली घोषणा फोल ठरली असल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यातील कृषी पंपांना विद्युत वाहिनी जोडणीकरीता महावितरणने रूपये ७५० कोटी मागितले होते, त्यापैकी रूपये ३५० कोटी उपलब्ध करून देण्यात आले. महावितरणने जी दरसूची दिली त्यात कामे करणे अशक्य असुन बाजारभाव व दरसूचित तब्बल ३० ते ३५ टक्के तफावत असल्यामुळे राज्यातील कंत्राटदारांनी कामांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) पूर्व विदर्भातील कामासाठी परिमंडळस्तरावर काढण्यात आलेल्या १४ निविदांपैकी १३ निविदांना व मंडळस्तरावर काढण्यात आलेल्या १६८ निविदांपैकी ८ निविदांपैकी प्रतिसाद मिळाला.
(२) व (३) प्रतिसाद न मिळालेल्या निविदा नवीन कॉस्ट डाटा २०१८-१९ प्रमाणे महावितरण कंपनीमार्फत पुर्न:प्रकाशित केलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी वसतिगृहातील विदयार्थ्यांच्या भोजनाचे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यास विरोध होत असल्याबाबत

(५) * ४१८८२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विभागामार्फत ४०० आश्रमशाळा व ५०० वसतिगृहे चालवली जात असुन आदिवासी वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची दुपार व सायंकाळच्या जेवणाची होणारी परवड थांबविण्यासाठी शासनाने दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकाद्वारे विद्यार्थ्यांच्या जेवणाचा खर्च त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाला राज्यभरातून विरोध होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना नाष्टा व भोजन ठेकेदारामार्फत दिले जात असताना प्रति विद्यार्थी ठेकेदारांना रुपये ६०००/- दिले जात होत आता शासनाने भोजन व नाष्टाची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा केली असून ती फक्त प्रतिमहा रुपये ३०००/- आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'अ', 'ब' व 'क' दर्जाच्या महानगरपालिका विभागीय शहर आणि जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या योजनेत समाविष्ट करण्यात येऊन घरापासून लांब अंतरावर तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) काही आदिवासी विद्यार्थी संघटनानी भोजन डी.बी.टी. बाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ या वर्षापर्यंत शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी निविदा प्रक्रिया राबवून भोजन पुरवठादाराची निवड करण्यात येत होती. त्यामध्ये जिल्हास्तरावरील वसतिगृहाकरीता रुपये २६००-२८०० प्रती विद्यार्थी व विभागीयस्तरीय व महानगरपालिकास्तरीय वसतिगृहासाठी रुपये २८००-३००० प्रती विद्यार्थी असा दर प्राप्त होत होता. तथापि, दिनांक ५ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयान्वये 'अ', 'ब' व 'क' दर्जाच्या महानगरपालिका व विभागीय शहरे येथील वसतिगृहातील मुलांना रुपये ३५००/- तर जिल्हास्तरावरील वसतिगृहातील मुलांना रुपये ३०००/- मासिक आहार भत्ता देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रथम टप्प्यात राज्यातील 'अ', 'ब' व 'क' दर्जाच्या महानगरपालिका, विभागीयस्तरीय शहरे आणि जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदर योजना राबविण्यात येत आहे. योजनेची फलनिष्पती लक्षात घेऊन पुढील टप्प्यात तालुकास्तरीय वसतिगृहाकरीता सदर योजना राबविण्याचा विचार करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

(६) * ४१७४८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९२९ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नावर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्यातील ३६ जिल्हयांमधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अहवालामध्ये समावेश करण्याचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सदरील संस्थेने आपला अहवाल पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविला आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करुन धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देणेबाबत शासन किती कालावधीत निर्णय घेणार आहे, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२), (३), (४) व (५) धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नाही. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून करण्यात येत असलेल्या सर्वेक्षण व संशोधनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील ३६ जिल्हयामधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अभ्यासक, अधिकारी व विशेष तज्ञ यांनी भेटी दिलेल्या विविध पाच

राज्यांचा अभ्यास व त्यातुन मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करुन त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. विविध समित्या व आयोग यांचे अहवाल, भारतीय जाती-जमातीचा मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय व ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास, न्यायालयीन निवाडे आणि धनगर समाजातील नागरिकांनी सादर केलेले दस्तऐवज या सर्वांचे चिकीत्सक परिक्षण करुन त्याचे संकलन करण्यात आले असून या संकलनाला मुख्य अहवालामध्ये समाविष्ठ करण्याचे काम सुरु आहे. संकलित माहितीच्या आधारे मुख्य अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतरच पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मराठी माध्यमाच्या सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करणेबाबत

(७) * ४१२७५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी, उर्दू व हिंदी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नसून सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनस्तरावर कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) राज्यातील ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगास आहेत. मराठी, ऊर्दू व हिंदी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित शाळांना मा.विद्युत नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या सार्वजनिक सेवा-अन्य वर्गवारीनुसार वीज दर

आकारणी करण्यात येते. १०० युनिटपेक्षा जास्त वापरासाठी लघुदाब सार्वजनिक सेवा अन्य वर्गवारीचे दर हे घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील साखर उद्योग व ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडल्याबाबत

(८) * ४१८०६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०९४७ ला दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-१८ च्या गाळप हंगामात साखरेच्या भावात मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्यामुळे राज्यातील शेकडो साखर कारखान्याकडून एफ.आर.पी. प्रमाणे ऊस उत्पादकांचे पेमेंट देण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर आयुक्त, पुणे यांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील १४२ साखर कारखान्यांच्या विरोधात जप्तीची कारवाई केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जप्त केलेली साखर वा कारखान्याची मालमत्ता विक्री करून राज्यातील किती ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचे पेमेंट केले वा करण्यात येत आहे, तसेच साखरेचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना करीत आहे,

(४) असल्यास, साखर उद्योगाच्याबाबतीत दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मा.मंत्री सहकार यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या बैठकीत कोणकोणते निर्णय करण्यात आले व या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत,

(५) असल्यास, राज्यात निर्माण होणाऱ्या अतिरिक्त ऊसाच्या गाळप संदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, त्याच्या तपशिल काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) नाही.

(३) साखर आयुक्त, पुणे यांनी RRC आदेशान्वये १० साखर कारखान्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्तीची कार्यवाही करणेस संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले असून त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन कारवाई सुरु आहे. सदर कारखान्यांकडून रुपये ५१८८७.३५ लाख RRC रकमेपैकी रुपये १४५६३.३५ लाख वसूल करण्यात आले असून दिनांक १५/०६/२०१८ अखेर रुपये ३७३२५.०० लाख थकीत आहेत.

साखरेचे भाव स्थिर ठेवण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिनांक ०७/०६/२०१८ रोजी जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अनुसार साखर प्रति किलो रुपये २९/- पेक्षा कमी दराने विक्री न करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

(४) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/०३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार आणि मा.मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६/०३/२०१८ रोजी उच्चस्तरीय कृती समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील साखर उद्योगाच्याबाबतीत केंद्र शासनाच्या अखत्यारीतील मुद्यांबाबत केंद्र शासनाकडे आवश्यक पाठपुरावा केला आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दिनांक ०७/०६/२०१८ च्या आदेशान्वये जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अनुसार साखरेचा किमान दर रुपये २९/- प्रति किलो असा निश्चित केलेला आहे आणि साखर उत्पादकांना माहे जून, २०१८ अखेर केंद्र शासनाने ठरविलेला साखरेचा बफर स्टॉक ठेवता येईल असे निर्देश दिलेले आहेत.

(५) हंगाम २०१७-१८ मध्ये अतिरिक्त ऊसाची बाब निदर्शनास आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर येथील कर्ज वाटपात बँक शेतकऱ्यांपासून दूर राहत असल्याबाबत

(९) * ४१९५४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील कर्ज वाटपात बँक शेतकऱ्यांपासून दूर राहत असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकंदर ३२ बँकामार्फत शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले असून केवळ ७ बँकांनी रब्बी हंगामात कर्ज वाटप केले, काही बँका कर्ज वाटपाचे उद्दिष्टही पुर्ण करु न शकल्याने शेतकऱ्यांना विहीत मुदतीत कर्ज उपलब्ध न झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शेतकऱ्याना विहीत मुदतीत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.

(२) नाही. सन २०१७-१८ च्या रब्बी हंगामासाठी सोलापूर जिल्ह्याला रुपये २३०९.४८ कोटी इतके उद्दिष्ट देण्यात आले होते, त्यानुसार जिल्ह्यातील २५ बँकांनी रुपये ११०६ कोटी (४७.८९ %) इतके पीक कर्ज वाटप केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या आदिवासी विकास विभागाने प्रलंबित वनहक्क दावे व अपिले निकाली काढण्यासाठी "वनमित्र मोहिम" राबविण्याबाबत

(१०) * ४१२९९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आदिवासी विकास विभागाने प्रलंबित वनहक्क दावे व अपिले निकाली काढण्यासाठी "वनमित्र मोहिम" राबविण्याचा निर्णय माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार आतापर्यंत किती वनहक्क दावे व अपिले निकाली काढण्यात आली व यामुळे किती आदिवासीना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाल्या आहेत,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन प्रलंबित वनहक्क दावे व अपिले यांचा निपटारा करण्यासाठी दिनांक ११ मे, २०१८ अन्वये विशेष "वनमित्र मोहिम" राबविण्यात येत आहे.

(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत दिनांक ३१ मे, २०१८ अखेरपर्यंत ३,७२,२७८ इतके वैयक्तिक व सामुहिक दावे ग्रामसभेकडे प्राप्त झालेले असून त्यापैकी एकूण १,६३,५३८ इतके दावे व अपिले जिल्हास्तरीय समितीने अंतिमरित्या मान्य केले असून एकूण ३०,६४,१०५.२० एकर वनक्षेत्र मंजूर केलेले आहे. त्यानुसार मान्य दावे, अपिल व वनक्षेत्र यांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

बाब	ग्रामसभे कडे प्राप्त दावे	अंतिमरित्या मान्य केलेले एकूण दावे, अपिल			मंजूर वनक्षेत्र (एकरमध्ये)
		मुळ दावे	अपिल दावे	एकूण	
वैयक्तिक दावे	३६०२६९	११०९१२	४५०९४	१५६००६	३४२८२५.३७
सामुहिक दावे	१२००९	७५२७	५	७५३२	२७२१२७९.८३
एकूण	३७२२७८	११८४३९	४५०९९	१६३५३८	३०६४१०५.२०

(३) व (४) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. वहका-२०१८/प्र.क्र.४३/का.१४, दिनांक ११ मे, २०१८ अन्वये राबविण्यात येत असलेल्या विशेष "वनमित्र मोहिम" अंतर्गत कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला असून सदर कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांनी मोहिम स्वरुपात वनहक्कांचे निर्णय घेण्याबाबत आवश्यक ते नियोजन करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. प्रस्तुत वनमित्र मोहिमेच्या प्रगतीबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय आढावा घेण्यात येत आहे.

तूर व हरभरा खरेदीसाठी गोदामे ताब्यात घेण्याबाबत

(११) * ४२२०१ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांची तूर आणि हरभरा जलगतीने खरेदी करता यावा यासाठी जिल्हास्तरावर उपलब्ध असलेली गोदामे ताब्यात घेण्यासाठी मा.कृषी व पणन राज्यमंत्री यांनी आदेश दिल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदामे उपलब्ध नसल्यामुळे सुमारे १००० कोटी रुपयांच्या तूरीचे नुकसान झाले असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, राज्यातील शेतकऱ्यांची तूर व हरभरा खरेदी करता यावा यासाठी जिल्हास्तरावर गोदामांची गरज असल्याने गोदामे उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच आतापर्यंत किती गोदामे ताब्यात घेण्यात आली,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.
(२) नाही.
(३) खरेदी केलेली तूर व हरभरा (चना) साठविण्यासाठी २११ अतिरिक्त गोदामे भाडेतत्वावर घेतलेली असून, यामध्ये पणन महासंघ, कापूस पणन महासंघ, कृषी उत्पन्न बाजार समिती महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, बुलढाणा अर्बन व अन्य खाजगी गोदामांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर (मनिष नगर) येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांला मारहाण झाल्याबाबत

(१२) * ४१३२५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (मनिष नगर) येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या युनिट क्र. ३ च्या वसतिगृहात सकाळच्या अल्पोपहाराबाबत आक्षेप घेणाऱ्या स्नातकोत्तर विद्यार्थ्यांची मेस संचालकांने तक्रार केल्याने वसतिगृहातील अधीक्षकाने विद्यार्थ्यांची बाजू ऐकून न घेता त्याच्या कानशिलात लावल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वसतिगृहात अधीक्षकांच्या कठोर वागणुकीमुळे विद्यार्थ्यांना रँगिगपेक्षा अधीक्षकांची भिती वाटत असल्याची कबुली विद्यार्थ्यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांस मारहाण करणाऱ्या अधीक्षकांची बदली करण्याव्यतिरिक्त कोणती कारवाई करण्यात आली व सदरहू अधीक्षकांविरुध्द कधीपर्यंत फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) संबंधित गृहपालाचा या वसतिगृहांचा कार्यभार काढून घेण्यात आला असून त्यांचेविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जातीच्या मुला-मुलींच्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी त्रुटी पूर्ततेबाबत

(१३) * ४१३९९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींच्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या जी.पी.एफ., पाचवा व सहावा वेतन आयोग, वसतिगृह अधीक्षक व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबत अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा.उच्च न्यायालय यांनी अनुसूचित जातीच्या मुला मुलींच्या आश्रमशाळेतील कर्मचारी यांना जी.पी.एफ., पाचवा व सहावा वेतन आयोग, वसतिगृह अधिक्षक व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना सुधारित वेतनश्रेणी देणेबाबत आदेशित केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास मा.उच्च न्यायालय यांचे आदेशानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.

(२) होय.

अनुसूचित जातीच्या आश्रमशाळेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याना शासन आदेश दिनांक २८/०३/२०१८ अन्वये वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दिनांक १४/०५/२०१८ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून, सदर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आश्रमशाळांना अनुदान देणेबाबत

(१४) * ४१५१० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २००६ मध्ये ३१९ आश्रमशाळांना मान्यता दिली असुन त्या व्यवस्थित चालू असुन या ३१९ आश्रमशाळांची सतत आठ वर्षापासून तपासणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ मध्ये तपासणीअंती ३१९ शाळांपैकी १०७ आश्रमशाळा अनुदानास पात्र झाल्या परंतु त्यांना अद्याप अनुदान दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरीत २१७ आश्रमशाळांची तपासणी करुन त्यापैकी अनुदानास पात्र झालेल्या आश्रमशाळांना व यापुर्वीच अनुदानास पात्र असलेल्या १०७ शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातीच्या मुला मुलींसाठी आश्रमशाळा या योजनेंकरीता राज्य शासनाने शिफारस केलेल्या ३२२ आश्रमशाळांपैकी ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर केलेले आहे.

उर्वरित आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर केले नसल्याने या संस्थांनी तसेच मा.लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाचे अनुदान मिळण्याची केलेली मागणी विचारात घेऊन, या आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तळोजा एमआयडीसीतील १२३ कारखाने बंद असल्याबाबत

(१५) * **४१२९४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख औद्योगिक वसाहतीमध्ये समावेश असलेल्या तळोजा एमआयडीसीतील एकूण ९७५ कारखान्यापैकी ८५२ कारखाने सुरु आहेत तर १२३ कारखाने बंद असल्याने नुकतेच माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त तळोजा एमआयडीसीमध्ये प्रदूषणाचा प्रश्न गंभीर असुन याठिकाणी पार्किंगसाठी एकही वाहनतळ नाही, तसेच सक्षम अग्निशमन यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उपरोक्त तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये येथील घोट, तोडरे, नितलस, खैरणे, ढोंगजयाचा पाडा, देवीचा पाडा, काणपोळी, वलप, पडघे, कोळवाडी, घोट कॅप्र, पेधर, वावंजे आदी गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झालेल्या असून अदयापी अनेक शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक वसाहतीत राखीव असलेल्या पार्किंगसाठी स्वतंत्र भूखंड ठेवण्यात आले नसल्याने संपूर्ण औद्योगिक वसाहतीला अवजड वाहनांचा वेढा घातलेला असुन शासनाला कारखानदारांकडून कोटयवधींचा महसूल प्राप्त होत असतानाही याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.

तथापि, औद्योगिक मंदी, बँक सील आजारी उद्योग यामुळे १२३ कारखाने बंद आहेत.

(२) हे खरे नाही.

महामंडळाच्या औद्योगिक प्रयोजनार्थ संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा जमीन मालकांना मोबदला देण्यात आलेला आहे.

(३) वाहनतळासाठी भूखंड आरक्षित नाही, हे खरे नाही.

तथापि, तळोजा औद्योगिक क्षेत्रात भूखंड क्र. पी-३१ हा वाहनतळासाठी राखीव आहे. मे. भारत उद्योग लि. यांना सदर भूखंड क्र. पी-३१ वर वाहनतळ विकासासाठी संकल्पना बांधा अर्थ चालवा व हस्तांतरीत करा (DBFO & T) या तत्वावर स्पर्धात्मक निविदेद्वारे देण्यात आला. याबाबतचा सवलत करारनामा (Concession Agreement) दिनांक १८/०३/२०११ रोजी करण्यात येऊन भूखंड क्र. पी-३१ क्षेत्र ४१४८० चौ.मी. चा ताबा (Deemed Possession) विकासक यांना दिला. सवलत करारनाम्यानुसार विकासकाने भूखंड क्र. पी-३१ वर करारनाम्याच्या तारखेपासून २४ महिन्याचा आत वाहनतळ विकसित करावयाचे होते. निर्धारीत कालावधीमध्ये वाहनतळाचा विकास न केल्याने मऔविम ने विकासकास सदरहू करार संपुष्टात आणण्याची नोटीस बजावली आहे. तसेच सदर भूखंड क्र. पी-३१ ची काही जागा वन विभागाची असल्याचे निदर्शनास आल्यामुळे व वन विभागाने सदरहू जागेवर वाहनतळ विकसित करण्यास

मज्जाव केल्याने व मऔविमने बजावलेल्या नोटीसीबाबत विकासकाने या विषयी लवादाकडे सप्टेंबर, २०१६ मध्ये दावा दाखल केला. लवादाने दिनांक ०२/१२/२०१७ रोजी विकासकाच्या बाजूने निर्णय दिला असून, या निर्णयाच्या विरोधात मऔविम तर्फे दिनांक १४/०६/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दिव्यांगाच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

(१६) * ४२३११ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग मुलांना शिक्षण देणाऱ्या अनेक शाळांमध्ये शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आकृतिबंधानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नसल्यामुळे दिव्यांग मुलांकडे लक्ष देता येत नाही, त्यामुळे गुणवत्तेवर देखील परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय.
(२), (३) व (४) राज्यातील बंद/नोंदणीप्रमाणपत्र रद्द केलेल्या शाळेतील प्रशासकीय मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांचे समायोजन हे प्रतिक्षा यादीवरील कर्मचाऱ्यांच्या समायोजनाच्या रिक्त पदांवर करण्यात येते. वित्त विभागाच्या दिनांक ०२/०६/२०१५ आणि दिनांक १५/०१/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार अनुज्ञेय असलेली रिक्त पदे भरण्यास आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे मार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

साखर कारखान्यांवर शेतकऱ्यांची थकबाकी असल्याबाबत

(१७) * ४१८७७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील दोन वर्षात विक्रमी साखरेचे उत्पादन झाल्याने साखरेच्या दरात घसरण झाल्याने साखर कारखान्यांवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सुमारे १६ ते १७ हजार कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिस्थितीमध्ये केंद्र शासनाने साखर निर्यातीला अनुदान देणे आणि राज्य शासनाने साखर रुपये ३२०० क्विंटल दराने खरेदी करण्याची आवश्यकता असुन सध्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान देण्याचा शासनाचा विचार नाही, यातून मार्ग काढण्यासाठी साखर कारखान्यांनी २० लाख टन साखर निर्यात करावी असा सल्ला केंद्र शासनाने दिला आहे, परंतू सध्या देशात साखरेचे दर कमी झाले आहेत तसेच निर्यात दरही कमी आहेत त्यामुळे साखर निर्यात करुनही साखर कारखान्यांना जास्त महसूल मिळणार नसल्याने साखर कारखानदारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून साखर निर्यातीला अनुदान मिळविण्याबाबत पाठपुरावा करण्यासाठी व साखरेला रुपये ३२०० प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) दिनांक ३०/०४/२०१८ अखेरच्या ऊसदर देयबाकी अहवालानुसार राज्यातील कारखान्यांकडे हंगाम २०१७-१८ मध्ये गाळप केलेल्या ऊसाचे रुपये २२१०.६४ कोटी देय एफ.आर.पी. पोटी थकित होती. तर दिनांक १५/०६/२०१८ अखेर देय एफ.आर.पी. पोटी रुपये १५४३.२० कोटी इतकी थकीत आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने दिनांक ०९/०५/२०१८ च्या आदेशान्वये राज्यातील १९४ साखर कारखान्यांना एकूण ६,४२,१०६ मे.टन साखर निर्यात कोटा निश्चित केला आहे. तसेच, गाळप हंगाम २०१७-१८ मध्ये थकीत एफ.आर.पी. ची रक्कम देण्यासाठी प्रति मे.टन गाळपासाठी रुपये ५५/- उत्पादन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे साखर निर्यातीला प्रोत्साहन मिळण्यासाठी निर्यात कर रद्द केला आहे. साखर निर्यातीला अनुदान देण्यासाठी केंद्र शासनाकडे आवश्यक पाठपुरावा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर कोराडी महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीतील सेवेतील वीज कर्मचारी संघटनांनी दिलेला आंदोलनाचा इशारा

(१८) * ४२३०१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर कोराडी महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीत काम करणाऱ्या तसेच सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाची दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीची निवृत्तीवेतन योजना लागू करणे व शासनाने यासबंधी दिनांक ३१ डिसेंबर, १९९६ ला घेतलेल्या ठराव क्र. ६२४ ची अंमलबजावणी करणे या मागणीसाठी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना व सेवेतील वीज कर्मचारी संघटनांनी आंदोलन करण्याचा इशारा माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर वीज कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत महाराष्ट्र विद्युत मंडळाचा ठराव क्र. ६२४, दिनांक ३१/१२/१९९६ ची अंमलबजावणी करणे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत तिन्ही कंपन्यांतील कार्यरत कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दिनांक ०७/०३/२०१८ च्या पत्रान्वये निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी ४८ तासांच्या संपाची नोटीस दिली होती. तसेच, वीज क्षेत्र बचाव संयुक्त कृती समितीने दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये एक दिवसीय धरणे आंदोलन नोटीस दिली होती.

(२) व (३) या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १६/११/२०१७ रोजी निवृत्तीवेतन योजनेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ठराव क्र. ६२४, दिनांक ३१/११/१९९६ बाबत योग्य तो निर्णय तीन महिन्यांच्या आत घेण्याबाबतचे आदेश दिले होते. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने "तिन्ही कंपन्यांची सध्याची आर्थिक स्थिती पाहता निवृत्तीवेतन योजना लागू करता येणार नाही. सबब, तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा निवृत्तीवेतन

योजनेसंदर्भातील मंडळ ठराव क्र. ६२४, दिनांक ३१/१२/१९९६ याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही" असा मंडळ ठराव क्र. ७१८/२०१८ दिनांक ०६/०२/२०१८ रोजी संमत केला आहे.

राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याबाबत

(१९) * ४१७४४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९२५ ला दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उदयोगांमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी मेक इन इंडिया, मॅग्नेटिक महाराष्ट्र, स्टार्टअप इंडिया इत्यादी माध्यमातून उदयोग धंदयात वाढ करण्यासाठी शासन प्रयत्न करीत असुन राज्यात विदर्भातील ऊर्जेवर अवलंबून असणारे अनेक कारखाने छत्तीसगडमध्ये गेले आहेत, कापूस उत्पादक क्षेत्रही छत्तीसगडकडे जात आहे, परभणी व मराठवाड्यातील अनेक उदयोग तेलंगण व आंध्रप्रदेशमध्ये जात आहे, उत्तर महाराष्ट्र, खानदेश येथील कामगारांची मोठ्या प्रमाणावर गरज असलेले अनेक उदयोग गुजरातमध्ये स्थलांतरीत झाले आहेत, दक्षिण महाराष्ट्रातील अनेक कारखाने कर्नाटकामध्ये गेले आहेत, वाहन उदयोग तामिळनाडूकडे गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकामे व सामाजिक क्षेत्रातील सुविधांवर केल्या जाणारा खर्चही महाराष्ट्रापेक्षा इतर राज्यात अधिक असल्याचे आर.एस.रुईकर इन्स्टिट्युट ऑफ लेबर ॲण्ड सोशल कल्चरल स्टडीज या संस्थेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, “मेक इन महाराष्ट्र” अंतर्गत आतापर्यंत राज्यात उद्योगाच्या माध्यमातून किती गुंतवणूक करण्यात आली वा येत आहे, त्यानुसार किती नविन उद्योग उभारण्यात आले व त्यातून किती बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे, तसेच राज्यात उदयोजकांची गुंतवणूक वाढवणे, उद्योगांचे स्थलांतर थांबविणे तसेच सामाजिक क्षेत्रातील सुविधांवर केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) व (२) हे खरे नाही.

(३) मेक इन इंडिया सप्ताह-२०१६ दरम्यान “मेक इन महाराष्ट्र” अंतर्गत उद्योग विभागाशी निगडीत एकूण २८५० सामंजस्य करार झाले व त्याव्दारे एकूण ३.९३ लक्ष कोटी गुंतवणूक अपेक्षित होती. सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीची प्रगती खालीलप्रमाणे आहे :-

सामंजस्य करार	संख्या	गुंतवणूक (रुपये कोटी)	प्रस्तावित रोजगार
पुर्ण	१०३६	७३५०६	२०८२६०
बांधकाम चालू असलेले प्रकल्प	७६१	१४३८०५	१७०३५६
प्राथमिक टप्पे पुर्ण केलेले प्रकल्प	५२३	१६६३२०	८२३३४०
एकूण	२३२०	३८३६३१	१२०१९५६

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील खैरणे एम.आय.डी.सी.तील सहा कंपन्याना आग लागल्याबाबत

(२०) * ४१३८८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खैरणे एम.आय.डी.सी.तील सहा कंपन्या दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजीच्या पहाटे आगीच्या भक्षस्थानी पडल्यानंतर ठाणे व बेलापूर पट्टयातील कंपन्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असून, राज्यातील अनेक कंपन्यांत अग्निशमन यंत्रणा सक्षम नसून सदर कंपन्या अग्निशमन दलाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करता निष्काळजीपणाने काम करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील २५ वर्षे पुर्ण झालेल्या ३२ अग्शिमन केंद्राचे वार्षिक लेखापरिक्षण होत नसल्याने व अग्निशमन विभागास फायर ऑडीटचे अधिकार नसल्याने एम.आय.डी.सी.कडूनही सुरक्षेच्यादृष्टीने या महत्वाच्या समस्येकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने कंपन्यांमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असुन राज्याच्या सर्व एम.आय.डी.सी. मधील कंपन्यांचे फायर ऑडीट वेळेवर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उदयोगांना ना-हरकत प्रमाणपत्र देताना आकारल्या जाणाऱ्या अधिकृत शुल्काबाबत शंका निर्माण होऊन शासनाचे नुकसान होत असुन प्रत्येक कंपनीमध्ये सक्षम आणि अद्ययावत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कृती आराखडा तयार केला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.

(२) महामंडळाची अग्निशमन केंद्रे ही स्थानिक अभियांत्रिकी विभागाशी संलग्न करण्यात आली असून महामंडळांतर्गत लेखा परिक्षण अधिकाऱ्यांकडून अग्निशमन केंद्राचे व मुख्यालयाचे वार्षिक लेखा परिक्षण करण्यात येते. तसेच महामंडळाचे शासकीय लेखा परिक्षक (Auditor General of India) यांच्याकडूनही लेखा परिक्षण करण्यात येते. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये कुठल्याही इमारतीचे फायर ऑडीट करण्याची तरतूद नाही. कारखाने अधिनियमानुसार औद्योगिक सुरक्षा संचालनालयास कारखान्याचे सुरक्षा तपासणी (Safety Audit) करण्याचे अधिकार आहेत. फायर अधिनियमानुसार इमारतीचे मालक अथवा भोगवटाधारक यांनी अग्निप्रतिबंधक उपाययोजना या सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र कायदयाने मान्यता प्रदान केलेल्या अनुज्ञाप्तीधारक (Licensed Agency) यांच्यामार्फत नमुना ब हे दरवर्षी माहे जानेवारी व जुलै या महिन्यांमध्ये स्थानिक अग्निशमन सेवेस देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या तरतुदीनुसार कुठल्याही नव्याने प्रस्थापित होणाऱ्या उद्योगांचे नकाशे मंजूर करताना सदर उद्योगास आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना सुचविल्या जातात. सदर उद्योगाची उभारणी झाल्यावर सुचविलेल्या अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांची पूर्तता केल्याची खात्री झाल्यावर सदर उद्योगास भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

सदर कारखान्याचे नकाशे मंजूर करताना महामंडळाच्या नियमाप्रमाणे अग्निसुरक्षा शुल्क आकारण्यात येते. मार्च, २०१६ पासुन महामंडळाने सदर सेवा ही उद्योजकांना ऑनलाईन पद्धतीने पुरविण्यात येत आहे. अग्निशमन सेवा शुल्क हे संगणकीयरीत्या परिगणीत करण्यात येते व सदर शुल्क हे ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सोय देखील महामंडळमार्फत करण्यात आलेली आहे.

जुन्या रासायनिक कारखान्यांमध्ये अग्नि सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी महामंडळाच्या अग्निशमन व अभियांत्रिकी विभाग व औद्योगिक सुरक्षा संचालनालय यांचेमार्फत चर्चासत्रे, कार्यशाळा आयोजित करण्यात येतात व त्याद्वारे आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात येते.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ हा दिनांक ६ डिसेंबर, २००८ पासुन संपुर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आला. सदर अधिनियम अस्तित्वात येणाच्या आधीपासुन भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केलेल्या इमारतींना/कारखान्यांना सदर अधिनियम लागू नाही.

त्यामुळे सदर कारखान्याच्या विस्तारीकरणानिमित्त अथवा पुनर्बांधणीचे नकाशे मंजूर करतेवेळी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ प्रमाणे अग्निप्रतिबंधक उपाययोजना सुचविल्या जातात व सदर सुचविलेल्या उपाययोजनांची पूर्तता केल्याची खात्री झाल्यावर सदर कारखान्यांना अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

राज्यात वाड्या, वस्त्या व पाड्यांचे विद्युतीकरण करण्याबाबत

(२१) * ४२०३१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व दुर्गम पाडे, वस्त्या विशेषत: नांदेड, गडचिरोली, नंदुरबार, जळगांव, अमरावती, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व इतर जिल्ह्यातील २ लाख ४५ हजार ५७३ गावे विद्युत पुरवठ्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनदयाळ ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून माहे डिसेंबर, २०१८ अखेर विद्युत पुरवठा करण्याचे उद्दिष्ट महावितरणने निश्चित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे. राज्यात एकूण ४१९२८ गावे असून त्यांचे विद्युतीकरण झालेले आहे. तथापि, एकूण १,००,६३९ वाडी-पाडे असून त्यापैकी ९९३९९ वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण महावितरणमार्फत व १७२ वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण महाऊर्जेमार्फत करण्यात आले असून उर्वरित १०६८ वाडीपाड्यांपैकी २२२ वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण मा.पंडित दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत, ११७ वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण जिल्हा वार्षिक नियोजन योजनेंतर्गत, ५८९ वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण अपारंपारिक पध्दतीने महाऊर्जेमार्फत व उर्वरित १४० वाडी-पाड्यांचे विद्युतीकरण सौभाग्य योजनेंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) हे खरे आहे. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत डिसेंबर, २०१८ अखेर ३,८६,४३९ दारिद्रयरेषेखालील घरांना विद्युत पुरवठा देण्याचे उद्दिष्ट आहे. माहे मे, २०१८ अखेर २३,३०० घरांना विद्युत पुरवठा दिला असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली, मुंबई येथील संजय गांधी उद्यानातील आदिवासी पाडे तसेच गोराई पाडा येथे वीज पुरवठा खंडीत असल्याबाबत

(२२) * ४२२७५ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील बोरिवली येथील संजय गांधी उद्यानातील आदिवासी पाडे तसेच गोराई पाडा अजूनही विजेशिवाय अंधारातच असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पंतप्रधानानी नुकतेच देशातील साऱ्या गावांना वीज पुरवठा झाला असे जाहिर केले असतांनाही उक्त आदिवासी पाड्यांना अद्यापपर्यंत वीज पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर आदिवासी पाड्यांना तातडीने वीज पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. ३०५/१९९५ मध्ये दिनांक ०७/०५/१९९७ व दिनांक ०३/१०/२००७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत कोणत्याही नविन नागरी सुविधा पुरविण्यात येवू नयेत, असे निर्देश आहेत. त्यामुळे आदिवासी पाड्यांकरीता नव्याने वीज वाहिनी टाकता येत नाही.

गोराई मधील जामझाडपाडा येथे नवीन वीज जोडणीसाठी सबस्टेशनच्या जागेसाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयाकडे मागणी केलेली आहे.
(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे हे वन जमिनीवर अतिक्रमीत असल्याने त्यांचे पुनर्वसन इतर पात्र अतिक्रमकांप्रमाणेच उद्यानाच्या हद्दीबाहेर करावे असे याचिका क्र. ९२५/२००० मध्ये दिनांक १५/०९/२००३ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. त्यानुसार मौजे मरोळ मरोशी येथे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पुनर्वसित होणाऱ्या पात्र आदिवासींना वीज जोडणीसह इतर मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध होतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दिव्यांगाच्या विविध मागण्यांबाबत

(२३) * ४२२६४ श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगांसाठी संजय गांधी निराधार योजनेच्या मानधनात वाढ करण्याच्या मागणीसह इतर प्रमुख मागण्यासाठी दिव्यांग संघर्ष समितीद्वारे माहे एप्रिल, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात पालकमंत्री, यवतमाळ यांच्या निवासस्थानावर अर्धनग्न मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोर्चेकऱ्यांच्या मागण्या कोणत्या आहेत, यापैकी किती मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत व उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, घटस्फोटीत आदी गरजु व्यक्तिंना संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन, इंदिरा गांधी निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना, कुटुंब सहाय्य योजना, आम आदमी योजना या लोक कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून योजनानिहाय अटी व निकषानुसार अर्थसहाय्य पुरविले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कल्याणकारी योजनांसाठी योजनानिहाय देण्यात येणारे अनुदान हे अपुरे व तुटपुंजे असल्याने सदरचे अनुदान रुपये २५०० इतके वाढवून देण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन राज्यातील संस्था कार्यकर्त्यांमार्फत दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेसह सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०६/०४/२०१८ रोजी पालकमंत्री यांच्या निवासस्थानावर होणारा मोर्चा जिल्हाधिकारी, यवतमाळ कार्यालयाकडे वळविण्यात आला होता. (२) दिव्यांग संघर्ष समितीच्या मागण्या व सदर मागण्यांवर शासनाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

दिव्यांग संघर्ष समितीच्या मागण्या	शासनाने केलेली कार्यवाही
१. संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.	१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
२. दिव्यांगाना व्यवसाय करण्यासाठी २०० चौ.फुट शासकीय कार्यालय परिसरात जागा उपलब्ध करुन देणे.	२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २६/०४/२००१, २५/०७/२००७ व ०६/०८/२००८ अन्वये उचित कार्यवाही करण्यात येते.
३. दिव्यांगांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात यावे.	३) अन्न, नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक १७/०७/२०१३ च्या शासन निर्णयान्वये अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी निवडतांना अपंग व्यक्तींना प्राधान्य देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
४. दिव्यांगांचे कर्ज माफ करण्यात यावे.	४) कर्जमाफी बाबत कोणताही प्रस्ताव विचाराधिन नाही.

५. अपंग वित्त विकास महामंडळामार्फत नविन कर्ज पुरवठा करणे.	५) नवीन कर्जपुरवठ्या संदर्भात महामंडळास आवश्यक सूचना देण्यात येत आहेत.
६. दिव्यांगांना घरकुल योजनेचा लाभ देणे.	६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/०९/२०१६ अन्वये रमाई घरकुल आवास योजनेत ग्रामीण क्षेत्रातील घरकुलाच्या संदर्भात अनु.जाती संवर्गातील अपंग लाभार्थ्यांना किमान ३ टक्के घरकुल देणे बंधनकारक राहील, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
७. दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ या कायदयाची राज्यात अंमलबजावणी करणे.	७) प्रस्तुत कायदयाची अंमलबजावणी राज्यात एप्रिल, २०१७ पासून सुरु करण्यात आली असून कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक २८/४/२०१७ च्या पत्रान्वये संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) व (६) संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रात वीज उत्पादन कंपनीकडून भारनियमनात वाढ होत असल्याबाबत

(२४) * ४१९४२ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना केवळ उत्पादनासाठी पुरेल एवढाच कोळसा दिला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळश्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे गत वर्षाप्रमाणे राज्याच्या भारनियमनात वाढ करण्यात येण्याची शक्यता वीज उत्पादन कंपनीने दर्शविलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात भारनियमन कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठा होण्यासाठी महानिर्मिती कंपनी व शासनस्तरावर पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात येत आहेत :-

महानिर्मिती कंपनीने SCCL या कोळसा कंपनीसोबत सध्या अस्तित्वात असलेल्या इंधन पुरवठा कराराखेरीज सन २०१८-१९ मध्ये १५ लक्ष मे.टन अतिरिक्त कोळसा घेण्यासाठी सामंजस्य करार केला आहे व त्यानुसार कोळसा पुरवठा सुरू आहे. कोळशाचा तुटवडा भरून काढण्यासाठी महानिर्मितीच्या जुन्या संचांचे (Old decommissioned Units) ४.२२९ द.ल.मे.टन इतक्या कोल लिंकेजचे कोराडी विस्तारीत प्रकल्पाकडे (३ x ६६० मे.वॅ.-Super Critical Units) हस्तांतर करण्यासाठी संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना विनंती केली आहे.

तसेच महानिर्मिती कंपनीने संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र (३ x ६६० मे.वॅ.) चंद्रपूर (२ x ५०० मे.वॅ.) आणि परळी (१ x २५० मे.वॅ.) या संचासाठीच्या सध्याच्या ब्रिज लिंकेजला वाढीव कोळसा मात्रेसह पुढील ३ वर्षासाठी (सन २०२१ पर्यंत) मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. महानिर्मितीने डब्ल्यु.सी.एल. च्या कोळसा खाणींमधून दररोज अंदाजे ११८०० मे.टन. एवढा कोळसा रस्ता वाहतुकीने औष्णिक विद्युत केंद्रांना पुरवठा करण्याचे काम कंत्राटाद्वारे सुरू केले आहे.

कोळसा पुरवठा वाढीसाठी कोळसा कंपन्या व केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली यांचेसोबत महानिर्मिती व शासनस्तरावर सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरू आहे.

महावितरण कंपनीतर्फे करारबध्द औष्णिक वीज कंपन्यांना पुरेशा प्रमाणात कोळशाचा आगाऊ साठा करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. तसेच महावितरण कंपनी सन २०१७-१८ प्रमाणे सर्वतोपरी उपाययोजना करून राज्यात भारनियमन होणार नाही याची दक्षता घेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही ऑरगॅनिक युनिट २ व देवा ड्रील या कंपन्यांना आग लागल्याबाबत

(२५) * ४१४५४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही ऑरगॅनिक युनिट २ व या कंपनीच्या शेजारीच असलेल्या देवा ड्रील कंपनीत दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन लागलेल्या आगीमुळे कंपनीचे तसेच औद्योगिक वसाहतीमधील इतर कंपन्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगीमुळे मनुष्यहानी व यंत्रसामुग्रीच्या झालेल्या नुकसानीचा अंदाज किती आहे, तसेच आग लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी दुपारी १३.०५ वा. महामंडळाच्या महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये मे.प्रिव्ही ऑरगॅनिक या कारखान्यामधील केबल ट्रे मध्ये स्पार्क होऊन ज्वालाग्राही रसायनांचे Integrated Bulk container (IBC) वर पडले व आग लागली. त्यामुळे सदर कंपनीचे व सदर आगीमुळे पश्चिम बाजुला असलेल्या मे.देवा ड्रील टेक इंडिया लि. या कारखान्याचे नुकसान झाले, हे खरे आहे.
(२) सदर आगीत मनुष्यहानी झालेली नाही. कारखान्याच्या यंत्र सामुग्रीची नुकसान भरपाई ही कारखान्याच्या विम्यातून स्वतंत्ररित्या होत असते. मे.प्रिव्ही ऑरगॅनिक या कारखान्यामधील केबल ट्रे मध्ये स्पार्क होऊन ज्वालाग्राही रसायनांचे Integrated Bulk Container वर पडले व आग लागली आहे.
(३) व (४) सदर आगीची चौकशी स्थानिक पोलीस विभाग व औद्योगिक सुरक्षा संचालनालयामार्फत करण्यात येत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून शेतमालाला हमी भावापेक्षा कमी दर देण्यात येत असल्याबाबत

(२६) * ४१९९९ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७३७ ला दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीतून अत्यल्प उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांची संख्या जास्त असून ही शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी किंमतीत व्यापारी शेतमाल खरेदी करीत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी किंमतीत शेतमाल खरेदी केल्यास तो गुन्हा ठरविण्यासाठी पणन अधिनियमात सुधारणा करण्याबाबत पणन संचालकांकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेऊन शेतमालाला कमी भाव देणाऱ्या दलालांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.
(२), (३) व (४) राज्यातील शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी किंमतीत शेतमाल खरेदी केल्यास तो गुन्हा ठरविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज जोडणी मिळण्याबाबत

(२७) * ४२०५४ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात पीक लागवडीला मुबलक पाणीपुरवठा व्हावा याकरीता शासनामार्फत कृषी पंप वीज जोडणीची योजना राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील शेतकरी फक्त भातशेतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असून तोंडली, कार्ले, सफेद कांदा, मिरची व अन्य भाजीपाला पिकांच्या लागवडीसाठी मुबलक पाणी मिळत नसल्यामुळे उन्हाळ्यात या पिकांची लागवड करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात माहे मार्च, २०१६ ते २०१८ या कालावधीत एकूण १७ हजार ९१५ शेतकऱ्यांनी कृषी पंप वीज जोडणीसाठी अर्ज केले असून सुमारे १ हजार १४२ शेतकऱ्यांनी पैसे भरूनही कृषी पंप वीज जोडणीचे प्रकरणे विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज जोडणीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.
(२) व (३) रायगड जिल्ह्यात मार्च, २०१६ ते मार्च, २०१८ अखेर एकूण २११२ कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून मार्च, २०१८ अखेर ५२१ कृषी पंप वीज जोडणीसाठी अर्ज पैसे भरुन प्रलंबित आहेत.
(४) राज्यातील कृषी पंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDC) द्वारे वीज पुरवठा करण्यासाठी शासनाने दिनांक ५ मे, २०१८ च्या निर्णयान्वये योजना जाहीर केली आहे.

सदर योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील कृषी पंप ग्राहकांना वीज जोडणी देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांवर वाढते अत्याचार व मृत्यूबाबत

(२८) * ४१५२८ श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३०८८४ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक, ठाणे, पालघर, अमरावती व नागपूर येथील आदिवासी विभागामधील २९ प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या १ हजार ४८ आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख ४३ हजार १८८ विद्यार्थी शिक्षण घेत असून गत १७ वर्षात आश्रमशाळेतून मुले बेपत्ता होणे, मुलांवर लैंगिक अत्याचार होणे, विद्यार्थ्यांचा सर्पदंश, आजारपण, अपघात, पाण्यात बुडणे अशा आकस्मिक कारणांमुळे विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याचे आढळून आले असून याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री व सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास समर्थन या संस्थेने एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना व कारणे सुचविण्याकरीता साळुंखे समितीची स्थापना करण्यात आली असुन त्यानुसार आश्रमशाळा संहितेमध्ये कोणते बदल करण्यात येत आहे, तसेच सदर मृत्यू व दूरव्यवहार रोखण्यासाठी शासनस्तरावर कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) समर्थन संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करण्यात येत असुन त्यामध्ये १) आहार, आरोग्य, पाणी व स्वच्छता, २) संरक्षण व सुरक्षितता, ३) तक्रार निवारण व सनियंत्रण या प्रकरणांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे, तसेच आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या

नव्याने विहित केल्या असुन आश्रमशाळांमध्ये किमान मुलभूत सुविधा निश्चित केलेल्या आहेत, याच बरोबर विदयार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करणे, विदयार्थ्यांचे हेल्थ कार्ड ठेवणे, आश्रमशाळांमध्ये जवळच्या उपकेंद्रातील A.N.M. यांची सेवा उपलब्ध करुन देणे आपात्कालीन परिस्थितीत खाजगी दवाखान्यात उपचार करणे, शाळा परिसरात मादक पदार्थ सेवन करण्यास मनाई, अधीक्षकांची रिक्त पदे भरणे, शाळास्तरावर विशाखा समिती गठित करणे, जिल्हास्तरावर महिला समिती मार्फत आश्रमशाळांची तपासणी करणे, शाळा व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण करणे, कायापालट अभियान, आश्रमशाळा विशेष दुरुस्ती मोहिम राबविणे, WASH कार्यक्रम अंमलबजावणी, विदयार्थी व शिक्षकांना जीवन कौशल्य शिक्षण देणे असे विविध उपक्रम विदयार्थी मृत्यू व दुरव्यवहार रोखण्यासाठी राबविण्यात आले आहेत.

बोहोनोली व काकोळे (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील वालधुनी नदीच्या पात्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

(२९) * ४१६७९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोहोनोली व काकोळे (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावांच्या हद्दीत वालधुनी नदीच्या पात्रात सिएट टायर्स कंपनीतर्फे राजरोसपणे अनधिकृत बांधकाम होत असल्याचे तक्रारवजा निवेदन श्री.सुधाकर वामन झोरे यांनी दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, अंबरनाथ व पोलीस ठाणे अंमलदार, शिवाजी नगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील तक्रारीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी दिनांक २ ते ४ मे, २०१८ रोजी असे सलग तीन दिवस अर्जदार श्री.झोरे हे तहसिलदार कार्यालय, अंबरनाथ येथे दिवसभर बसून असतानाही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नदी पात्रातील दगड फोडण्यासाठी ब्लास्टिंग करण्यात आले असून त्यासाठी सदरहू कंपनीने महसूल यंत्रणा, पर्यावरण विभाग किंवा पोलीस यंत्रणेच्या आवश्यक त्या विहित परवानग्या घेतल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही

(३) व (४) मे.सिएट कंपनीने नदी पात्रात १०० ब्रास रेती व २०० ब्रास दगड उत्खनन केल्याने कंपनीला सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी स्तरावरुन नोटीस देण्यात आली आहे.

अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामधील १९६७९९.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मे.सिएट स्पेशालिटी टायर्स प्रा.लि यांना वाटप करण्यात आले असून ५८६५०.८३ चौ.मी. क्षेत्रावर महामंडळाने दिनांक २०/१०/२०१६ रोजी बांधकाम परवाना दिलेला आहे.

या भुखंडामधून ऋतुनुसार वाहणारा नैसर्गिक प्रवाह सुरळीतपणे वाहन्याकरीता प्रवाहाच्या दोन्ही बाजूंचे मजबुतीकरण करण्याकरीता भूखंडधारकाने केलेल्या मागणीस महामंडळाने दिनांक १०/०६/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार भुखंडधारकाने प्रवाहाच्या बाजूने कॉंक्रिटची भिंत बांधली. मागील वर्षीच्या पावसाळयामध्ये प्रवाहाच्या बाजूने बांधलेल्या भिंतीपैकी १०५ मी. लांबीची भिंत ही माती भरावाच्या दाबाने झुकली व त्या भिंतीस तडे गेल्यामुळे सदर भिंत काढून लोह/सळई युक्त कॉंक्रिटची भिंत, महामंडळाने दिलेल्या मंजूरी नुसारच पुनश्च: बांधण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता, मऔविम, अंबरनाथ दिनांक २१/०५/२०१८ रोजी मे.सिएट स्पेशालिटी टायर्स प्रा.लि. कंपनीस सदर काम हे दिलेल्या परवानगीनुसारच करण्याचे लेखी कळविले आहे. दिनांक २८/०५/२०१८ रोजी

तक्रारदार यांचे समवेत महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली व कंपनीस मऔविमने दिलेल्या परवानगीनुसारच काम करण्यास सांगण्यात आले. प्रवाहाच्यामध्ये येणाऱ्या वटवृक्षास संरक्षक भिंत बांधून त्याचे योग्य प्रकारे जतन करण्याचे आदेश सुध्दा देण्यात आले व तसे लेखी आश्वासन मे.सिएट कंपनी यांनी दिलेले आहे. भारतीय प्राद्योगिक संस्था, पवई, मुंबई यांनी दिलेल्या संकल्पचित्रानुसार भिंतीचे बांधकाम पुर्ण करण्यात येणार असुन नैसर्गिक पात्रामधील सर्व राडारोडा काढुन टाकण्यात यावा याबाबतही कळविले आहे. दिनांक १०/०५/२०१८ रोजी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान सदर भिंतीचे बांधकाम हे पुर्वी बांधण्यात आलेल्या भिंतींच्या ठिकाणी बांधण्यात येत असल्याचे आढळून आले. मे.सिएट स्पेशालिटी टायर्स लि. यांनी नैसर्गिक प्रवाहामध्ये संरक्षक भिंतीस जलप्रवाहासाठी आरसीसी कॉलम उभे करुन बसविण्यात आलेली लोखंडी जाळी त्वरीत काढून टाकण्याबाबत महामंडळाने कळविले आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील बंद पडणाऱ्या विद्युत निर्मितीबाबत

(३०) * ४२६३६ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील बंद पडणाऱ्या विद्युत निर्मितीचे नुकसान टाळण्यासाठी महाजनकोकडुन उपसा योजनेला भांडवली अंश देण्याचा करार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंशदान करारानुसार १४२ कोटी रुपये जलसंपदा विभागाला देऊन ७५ टक्के योजना पुर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरील करार केलेल्या योजनेला स्थगिती दिल्यामुळे योजनेवर खर्च करण्यात आलेले १२२ कोटी रुपयांची केलेली कामे शासनाच्या उदासिनतेमुळे निष्फळ ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजना सुरळीतपणे सुरु झाल्यास ९० किलोमीटर लांबून माजलगाव येथुन पाणी आणण्याऐवजी १० किलोमीटर अंतरावरील लोणीसावंगी बंधाऱ्याजवळून गोदावरीतील पुराचे वाहुन जाणारे पाणी

माजलगाव धरणात सोडण्यासाठी ही योजना अंमलात आणुन ६० दलधमी पाणी औष्णिक विद्युत केंद्राला व ९० दलधमी पाणी पिण्याकरीता उपलब्ध करण्याचे या करारात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील योजना कधीपर्यंत पुर्ववत करणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय.

(२) माजलगांव उपसा सिंचन योजनेसाठी महानिर्मिती कंपनी व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास मंडळ, औरंगाबाद यांच्यामध्ये दिनांक २५/०३/२०१३ रोजी सामंजस्य करार झालेला आहे. सदर करारानुसार या प्रकल्पासाठी भागभांडवली अंशदान म्हणून रुपये १९९.८६ कोटी पुढील तीन वर्षात गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास मंडळ, औरंगाबाद यांना देणे प्रस्तावित होते. त्यानुसार भांडवली अंशदानापोटी जानेवारी, २०१५ पर्यंत रुपये १४२ कोटी महानिर्मिती कंपनीने मंडळास अदा केले आहेत. सदर प्रकल्पाचे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

(३) माजलगांव उपसा सिंचन योजनेच्या पाणी उपलब्धतेला केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचेकडून जलनिष्पती तपासणीचे काम प्रगती पथावर आहे. त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजनेची उर्वरीत कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) याबाबत प्रधान सचिव, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने चौकशी पूर्ण केली असून वर नमूद केल्याप्रमाणे जलनिष्पती प्रमाणित करुन मिळाल्यानंतर योजनेची उर्वरित कामे सुरु करण्यात येतील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय वसतिगृहातील विदयार्थ्यांना दरवर्षी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागत असल्याबाबत

(३१) * ४२६१४ श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोरगरीब आदिवासी मुलां-मुलींना आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश दिल्यानंतर दरवर्षी या विदयार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमुळे आदिवासी गोरगरीब विदयार्थ्यांना समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे विदयार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना वसतिगृहात प्रवेशित ठेवण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२) व (३) राज्यातील अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना त्यांच्या शिक्षणाकरीता निवास व्यवस्था, आहार, निर्वाह भत्ता तसेच शैक्षणिक साहित्य इ. सुविधा उपलब्ध करून घेण्याकरीता शासकिय आदिवासी वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्याकरीता प्रथम वर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावी लागते. त्यानंतर दर वर्षी सदर विद्यार्थ्यास त्याचा प्रवेश निश्चित करण्याकरीता फक्त ऑनलाईन अर्जाचे नुतनीकरण करावे लागते. अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पुर्ण होईपर्यंत वसतिगृहात राहता येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) नाफेडमार्फत तूर खरेदी केंद्र बंद केल्याबाबत

(३२) * **४१४४३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) नाफेडमार्फत दिनांक १५ मे पर्यंत तूर खरेदी सुरु असतांना व शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली असताना अचानकपणे दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास तूर खरेदी बंद केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुषंगाने शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्याकरीता शासनाने संबंधित यंत्रणेला आदेश दिले आहेत काय तसेच तूर खरेदी न करण्याऱ्या नाफेडच्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.

पुसद, जि.यवतमाळ येथे किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत हमीभावाने तूरीची खरेदी करण्यासाठी दिनांक ५/०२/२०१८ रोजी खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले होते. दिनांक २ मे, २०१८ रोजी पुसद खरेदी केंद्रावर १६ शेतकऱ्यांकडून २५८.११ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार तूर खरेदीचा कालावधी दिनांक १८/०४/२०१८ पर्यंत होता. तथापि, नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची तूर खरेदी करणे शिल्लक असल्याने, राज्य शासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक १५/०५/२०१८ पर्यंत खरेदीचा कालावधी वाढविला होता.

(२) यवतमाळ जिल्ह्यातील १२ खरेदी केंद्रांपैकी पुसद येथील खरेदी केंद्रावर खरेदी कालावधीत एकूण १२८८३ क्विंटल तूरीची खरेदी झालेली असून, लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या ९७९ इतकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या विद्युत टॉवरचा योग्य मोबदला मिळण्याबाबत

(३३) * ४२१३४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवर मोठमोठे विदयुत टॉवर उभारण्यात आले असून त्याचा योग्य मोबदला मिळाला नसल्याने सदरहू शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन टॉवर विरोधी कृती समिती स्थापन केली असुन राज्यभरात त्याविरोधात आंदोलने केली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) या संदर्भात निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) महापारेषण कंपनीच्या व पारेषण परवाना धारक कंपन्यांकडून अतिउच्च दाब विद्युत वाहिनीचा मनोरा व वाहिनी उभारताना उभ्या पिकांना / फळ झाडांना / इतर झाडांना झालेल्या नुकसानीची भरपाई दिनांक ०१/११/२०१० च्या शासन निर्णयानुसार देण्यात येत होती. तद्नंतर केंद्र शासनाच्या दिनांक १५/१०/२०१५ च्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेच्या मोबदल्यात वाढ करण्याबाबत व वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला देण्याबाबतचे सुधारित धोरण शासन निर्णय दिनांक ३१/०५/२०१७ अन्वये लागू करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार मनोऱ्याने व्याप्त जमिनीस शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे (रेडीरेकनर) त्याच्या मूल्यांकनाच्या दुप्पट मोबदला तसेच वाहिनीखालील

जमिनीस शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे (रेडीरेकनर) मूल्यांकनाच्या १५% मोबदला देण्यात येतो. सदर मोबदल्या व्यतिरिक्त संबंधित व्याप्त जमिनीवरील पिके, फळझाडे यांचे जिल्हास्तरावरील उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने दिलेल्या मूल्यांकनानुसार नुकसान भरपाई देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांची लूट करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३४) * ४२६६६ प्रा.डॉ.तानाजी सावंत : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शेतमाल विकूनही आडत बंद असतानाही शेतकऱ्यांकडून बेकायदा दोन टक्के कटाव घेणाऱ्या शेतकरी व ग्राहक यांची लूट करणाऱ्या १९२ अडत्यांना बाजार समिती प्रशासन पाठीशी घालत असल्याचे दिनाक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक वर्तमानपत्रात सदर माहिती प्रकाशित झाल्यानंतर प्रशासनाने २५० आडत्यांची दप्तरे ताब्यात घेण्यात आली त्यापैकी दोषी १९२ अडत्यांना नोटीसा बजावण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३). असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ११ कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यरत असून एकाही बाजार समितीकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) स्थानिक वर्तमानपत्रामध्ये या आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले होते. परंतु सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त नसल्याचे व आडत्यांना नोटीस बजावल्या नसल्याचे सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर यांनी नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना स्वस्त दरात वीज उपलब्ध करून देणेबाबत

(३५) * ४२१४९ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शासनामार्फत सर्व लाभ दिले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना व्यापारी दराप्रमाणे वीज दिली जाते, तसेच राज्यातील खाजगी अनुदानित ८००० माध्यमिक शाळामध्ये केंद्र शासन पुरस्कृत आयसिटी योजनेंतर्गत प्रत्येकी रुपये १८ लक्ष याप्रमाणे रुपये १४४० कोटी किंमतीच्या संगणक प्रयोगशाळा दिल्या असुन सदर संगणक प्रयोगशाळा अवाजवी वीज बिलामुळे सतत चालू ठेवल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्चून सुद्धा विद्यार्थी संगणकीय शिक्षणापासून वंचित राहत आहेत तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना मोफत अथवा स्वस्त दरात वीज उपलब्ध करून मिळावी म्हणून शासनाकडे याबाबत वारंवार मागणी केली जात आहे, सदर शाळांना स्वस्त दरात वीज उपलब्ध करून देणेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) खाजगी अनुदानित शाळांना शालेय शिक्षण विभागामार्फत वेतन व वेतनेतर अनुदान दिले जाते.

(२) राज्यातील ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. शाळांना मा.विद्युत नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या सार्वजनिक सेवा (Public Services) वर्गवारीनुसार वीज दर आकारणी करण्यात येत असून ते वाणिज्यिक दरापेक्षा कमी आहेत. राज्यातील ८००० खाजगी अनुदानित शाळांना केंद्र शासन पुरस्कृत आयसिटी योजनेंतर्गत प्रती प्रयोगशाळा ८.४० लक्ष ते रुपये १७.९० लक्ष किंमतीच्या संगणक प्रयोगशाळा देण्यात आल्या आहेत. सदर योजनेंतर्गत संगणक प्रयोगशाळेच्या वीज बिलापोटी योजनेच्या पाच वर्षाच्या कालावधीसाठी शालेय शिक्षण विभागामार्फत दरमहा रुपये ३००/- दिले जातात.

(३) मा.आयोगाचे वीज दर आदेश दिनांक १६/०८/२०१२ नुसार सार्वजनिक सेवा ही नवीन वर्गवारी लागू करण्यात आली. सार्वजनिक वर्गवारीचे दर हे वाणिज्यिक दरापेक्षा कमी आहेत. तसेच १०० युनिटपेक्षा जास्त वापरासाठी लघुदाब सार्वजनिक सेवा वर्गवारीचे दर हे घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) येथील विजेचे खांब व विद्युत वाहिन्या बदलण्याबाबत

(३६) * ४२७१९ श्री.प्रसाद लाड, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील वीज वितरण कंपनीच्या शिरसाड (कणेर) या कार्यालयांतर्गत येणाऱ्या १५ गावांतील उच्च दाबाच्या वीज वाहिन्या व खांब सुमारे ३५ ते ४० वर्षाचे जुने झाल्याने अनेक ठिकाणी खांब सडलेल्या, वाकलेल्या अवस्थेत तसेच वीज वाहिन्या गंजलेल्या असल्याने अनेक ठिकाणी वारंवार तुटत असल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असून

स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत मागील २ वर्षापासून सातत्याने वीज वितरण कंपनीकडे तक्रारी केल्या असतानाही वीज वितरण कंपनीकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरणच्या या कारभाराचा फटका खानिवडे, भालिवली, कशींद, चिमणे, हेडवडे, सकवार, पाचरूखे, भारोळ, बेलवाडी यासह १५ गावांना बसत असून पावसाळयात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असून १५ गावातील हजारो नागरीकांचा जीवन धोक्यात असुन याबाबत वारंवार तक्रारी करून आजमितीस सदरहू गावातील कालबाहय झालेले गंजलेले विजेचे खांब तसेच वीज वाहिनी न बदलण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच वसई तालुक्यातील सदरहू १५ गावातील गंजलेल्या वीज वाहिन्या, सडलेले व वाकलेले खांब विनाविलंब बदलण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१), (२) व (३) हे खरे आहे.

पालघर जिल्हयांतर्गत महावितरण वसई मंडळामधील विरार विभागांतर्गत विरार (पू.) येथील शिरसाड (कणेर) येथील गावात काही ठिकाणी उच्च दाबाच्या वीज वाहिन्या व खांब सुमारे ३५ ते ४० वर्षाचे जुने झाल्याने अनेक ठिकाणी खांब सडलेल्या वाकलेल्या अवस्थेत होते. सदर गांवामध्ये ३६ लघुदाब खांब बदलणे आणि ६.९ कि.मी. लघुदाब वाहिनी एबी केबलमध्ये रुपांतरीत करण्याचे काम पूर्ण झालेले आहे. शिरसाड, सकवार, खानीवडे या गावातून जाणाऱ्या शिरसाड उच्चदाब वाहिनीच्या १ कि.मी. जुन्या तारा बदलविण्यात आलेल्या आहेत. तसेच ४६ लघुदाब खांब बदलणे, १०.२६ किमी लघुदाब वाहिनी एबी केबलमध्ये रुपांतरीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला औद्योगिक वसाहती मधील ऑईल आणि केमिकलशी संबंधित उद्योगास पाणीपुरवठा करण्याबाबत

(३७) * ४३०६३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला औद्योगिक वसाहतीमधील ऑईल आणि केमिकलशी संबंधित उद्योग पाण्याअभावी अडचणीत आल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑईल मिल्स, दाल मिल्सची संख्या अकोल्यात सर्वात जास्त असल्याने अमरावती विभागातून सर्वात जास्त महसूल उद्योजकाकडून दिला जात असतानाही या उद्योगातील पाणी पुरविण्यात एमआयडीसीला अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या एमआयडीसीतील सर्व उद्योजकांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.

(२) पाणी टंचाई काळात खांबोरा येथील उन्नयी बंधाऱ्यातून महामंडळास पाणी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे पाटबंधारे विभागाच्या कुंभारी लघु पाटबंधारे प्रकल्प, महामंडळाची विहिर व खाजगी जलस्त्रोत इ. उपलब्ध असलेल्या पर्यायी जलस्त्रोताकडून अकोला औद्योगिक क्षेत्राकरीता पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) व (४) महामंडळाने अकोला औद्योगिक क्षेत्र व अकोला विकास केंद्रातील ८००.९५ हे.आर क्षेत्रफळावर आरेखित भूखंडाकरीता रस्ते व जलवितरिका इ. मुलभूत सोयी पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच अकोला विकास केंद्रात नव्याने प्राप्त झालेल्या २२.७४ हे.आर क्षेत्रफळाच्या आराखड्यात १.६० कि.मी. लांबीचे रस्ते व जलवितरिका टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. अकोला औद्योगिक क्षेत्रात थेट महान धरणातून पाणी उचल करुन पाणीपुरवठा योजनेबाबतचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.

पुणे येथील कागद, काच, पत्रा सफाई करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

(३८) * ४३७३५ श्री.अनिल भोसले : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कागद, काच, पत्रा सफाई करणाऱ्या कामगारांच्या सुमारे अडीच हजार मुलांना केंद्र शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती गत ३ वर्षापासून मिळाली नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार या वंचित घटकांतील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.

(२) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मागील तीन वर्षापासून समाजकल्याण कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जापैकी पात्र विद्यार्थ्यांचे सर्व अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत.

परंतु, शाळांच्या स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज कागदपत्रांची पूर्तता व तांत्रिक अडचणीमुळे भरले गेले नसल्याचे निदर्शनास आले असून असे अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने गतवर्षी खरेदी केलेली तूर गोदामात पडून असल्याबाबत

(३९) * ४१६५६ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अनिल भोसले, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील २ वर्षापासून शासनाने खरेदी केलेली सुमारे ६९ लाख ७२ हजार ७८५ क्विंटल तूर विविध गोदामात पडून असुन २५ जिल्ह्यातील ४ लाख १४ हजार ८४४ शेतकऱ्यांनी तूर खरेदीसाठी नोंदणी केली असून त्यापैकी १ लाख ५४ हजार ६३७ शेतकऱ्यांकडून तूर खरेदी झाली असुन अद्याप २ लाख ५८ हजार २६५ हजार शेतकऱ्यांची ३१ लाख २२ हजार क्विंटल तूर खरेदी शिल्लक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तूर एकाधिकार खरेदी अंतर्गत शासनाने सुरु केलेल्या खरेदी केंद्रावर तूर खरेदीसाठी दिनांक १८ एप्रिल, २०१८ ही तारीख शेतकऱ्यांना अंतिम तारीख देण्यात आली होती मात्र अनेक केंद्रावर संगणकीय पध्दतीने नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना तूर खरेदीसाठी मा.केंद्रीय कृषी मंत्री यांनी देण्यात आलेल्या १५ दिवसाच्या वाढीव मुदतीचा आदेश संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात वेळेवर येऊन देखील सदर आदेशासंदर्भात जिल्ह्यातील तूर खरेदी शेतकरी व तूर केंद्र प्रमुखांमध्ये गोंधळ निर्माण झाल्याने तूर खरेदीच्या संदर्भात खरेदी केंद्रावर गोंधळ निर्माण झाला असुन शासन आणि खरेदी यंत्रणा असलेल्या नाफेडकडून यासंदर्भात पणन महामंडळाला कुठलेही पत्र आले नसल्याने तूर खरेदी अद्यापही बंदच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तूर खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी घातलेली तूर भरण्यासाठी व सुरक्षिततेसाठी पुरेशा प्रमाणात गोण्या (पोती) तसेच साठवणीसाठी पुरेशी गोदामे नसल्याने तूरीचे मोठमोठे ढीग तूर खरेदी केंद्रावर अनेक दिवस राहिल्याने तूरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तूर खरेदी केंद्राच्या ठिकाणी पुरेशा गोणी (पोती) व तूर साठवणूकीसाठी पुरेशी गोदामे वेळेवर उपलब्ध होत नसल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांची खरेदी केलेली तूर अमरावतीला तर उस्मानाबादची तूर सांगलीला घेऊन जावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हंगाम २०१६-२०१७ मध्ये केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत एकूण ७६.९४ लाख क्विंटल तूरीची खरेदी केली होती. त्यापैकी राज्य शासनाने खरेदी केलेल्या तूरीची व तूरडाळीची विक्री करण्यात येत आहे. त्यामुळे गोदामामधील जागा रिकामी होत आहे.

हंगाम २०१७-२०१८ मधील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी दिनांक २५/०६/२०१८ पर्यत २,३०,६४२ शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करणे शिल्लक होते.

हंगाम २०१७-२०१८ मधील किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत तूर खरेदीसाठी NeML पोर्टलवर नोंदणी केलेल्या परंतु ज्यांच्याकडून तूर खरेदी केलेली नाही अशा शेतकऱ्यांना रुपये १०००/- प्रति क्विंटल अनुदान शासन निर्णय, दिनांक १९/०६/२०१८ अन्वये मंजूर करण्यात आले आहे.

(२) नाही.

राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत तूर खरेदीला दिनांक ०१/०२/२०१८ रोजी २५ जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार खरेदीचा कालावधी ९० दिवसाचा होता. तूर खरेदीचा अंतिम दिनांक २८/०४/२०१८ पर्यंत होता. तथापि, या कालावधीत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून तूर खरेदी होऊ न शकल्याने, राज्य शासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने तूर खरेदीचा कालावधी दिनांक १५/०५/२०१८ पर्यंत वाढविण्यात आला होता.

दिनांक १८/०४/२०१८ पर्यंत १९.८३ लाख क्विंटल आणि मुदतवाढीच्या काळात ६.४८ लाख क्विंटल तूरीची खरेदी झालेली आहे.

(३) व (४) शेतकऱ्यांना SMS पाठविण्यात आल्यानंतर, शेतकरी खरेदी केंद्रावर माल घेऊन आल्यानंतर, FAQ मालाची खरेदी केली जात होती व खरेदी केलेली तूर गोदामामध्ये पाठविण्यात येत होती.

तूर व हरभरा साठवणूकीसाठी गोदामे अपुरी असल्याने अतिरिक्त २११ गोदामे भाडेतत्वावर घेऊन, त्यामध्ये खरेदी केलेल्या मालाची साठवणूक केली आहे. ज्या ठिकाणी साठवणूकीसाठी जागा उपलब्ध होईल तिथे माल पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील महावितरणने जादाचे विद्युत देयक दिल्यामुळे श्री.जगन्नाथ शेळके यांनी आत्महत्या केल्याबाबत

(४०) * ४२४५९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.अनिल परब, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या गारखेडा विभागातील वीज देयक निर्गमित करणाऱ्या विभागाकडून दुर्गेशनगर येथील भाजी विक्रेते श्री.जगन्नाथ नेहाजी शेळके यांना ८ लाख ६५ हजार २० रुपयांचे जादा वीज देयक देऊन वीज देयक भरण्याची सक्ती केल्याने त्यांनी दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथील श्री.जगन्नाथ शेळके यांच्या आत्महत्येची जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच नियमित वीज देयकापेक्षा भरमसाठ वीज देयक आले त्यावर कार्यवाही करण्यासाठी निश्चित असे धोरण आखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच श्री.जगन्नाथ शेळके यांच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन मयत शेळके यांच्या कुटुंबियांना महावितरणकडून आर्थिक मदत करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वीज बील मिटर रिडींग घेणे तसेच वीज देयक वाटप करणाऱ्या यंत्रणांवर महावितरणाचे कोणत्याही स्वरुपाचे नियंत्रण नाही व यामुळे कमी वापर असणाऱ्या ग्राहकांना मीटर रिडींगचा विचार न करता सर्रास देयक वाढवून दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय तसेच याबाबत शासन यावर काही उपाययोजना करणार आहे काय, त्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील साडेदहा लाख ग्राहकांचे वीज मीटर प्रत्यक्ष रिडिंग न घेताच सरासरीमध्ये बिले पाठविण्यात येऊन सदर वीज मीटर मध्ये तांत्रिक बिघाड असल्याने वीज वापरापेक्षा जादा वीज बिल येत असल्यामुळे ग्राहकांना वाढीव देयकांचा भुर्दंड सोसावा लागत असुन नादुरूस्त असलेले सर्व वीज मीटर बदलून नवीन वीज मीटर लावण्यात आले आहेत काय व कधीपर्यंत मीटर बदलण्यात येणार आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) पोलीस एफआयआर क्र. १०७/१८, दिनांक ११/५/२०१८ प्रमाणे श्री.जगन्नाथ नेहाजी शेळके यांनी दिनांक ११/५/२०१८ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केलेली आहे. श्री.जगन्नाथ नेहाजी शेळके, ग्राहक क्र. ४९००१२२९८१९३ यांना माहे एप्रिल, २०१८ चे ५५५१९ युनिटचे रुपये ८६४७८१/- चे वीज देयक देण्यात आलेले होते. परंतु, त्यांना वीज देयक भरण्याची कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात आलेली नव्हती. तसेच सदरहू

देयक दुरुस्तीसाठी ग्राहकाकडून कुठलाही अर्ज अथवा तक्रार महावितरण शाखा कार्यालय किंवा उपविभागीय कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तसेच ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष किंवा ग्राहक तक्रार निवारण मंच येथे सुध्दा अशी कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल केलेली नाही.

(२) महावितरणच्या देयक निर्गमित करण्याच्या प्रचलित पध्दतीनुसार नियमित वीज बिलापेक्षा अवास्तव देयक आढळून आल्यास सदर देयकाची पडताळणी करुन व त्याची योग्य दुरुस्ती करुनच ग्राहकाला वीज देयक देण्याची यंत्रणा आहे. परंतु, सदरहू प्रकरणात ही काळजी न घेता चुकीचे देयक निर्गमित केल्यामुळे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहाय्यक लेखापाल व कनिष्ठ लेखा सहाय्यक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच श्री.जगन्नाथ शेळके यांच्या आत्महत्ये प्रकरणी श्रीमती भागीत्राबाई शेळके यांच्या तक्रारीवरुन गु.र.क्र. १०७/१८ कलम ३०६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे पोलीस ठाणे पुंडलिक नगर, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल असून सदर प्रकरणी चौकशी चालू आहे.

(३) हे खरे नाही. महावितरणतर्फे घरगुती व वाणिज्यिक वर्गवारीतील ग्राहकांचे मीटर वाचन करणाऱ्या यंत्रणावर लक्ष ठेवण्यासाठी मोबाईल ॲपद्वारे मीटर वाचनाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(४) नादुरुस्त वीज मीटर बदलण्यासाठी वीज मीटर उपलब्ध करुन देण्यात आलेले असून माहे ऑक्टोबर, २०१७ ते मे, २०१८ या कालावधीत ३.५ लक्ष नादुरुस्त मीटर बदलण्यात आलेले असून उर्वरित नादुरुस्त मीटर बदलण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

गोंडवाना संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत

(४१) * ४३२९७ श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडसंस्कृतीचे संर्वधन, प्रचार-प्रसार करण्यासाठी सन २००२ मध्ये मंजूर झालेले गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालय १६ वर्षापासून जागा निश्चितीच्या वादात अडकले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेलंगखेडी, चिखली तर कधी महाराजबागेच्या जागेच्या वादामुळे संग्रहालय उभारण्याचे काम प्रलंबित राहिले असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय उभारण्यासाठी शासनाने पुढाकार घेतल्यानुसार आतापर्यंत केंद्राने दोन टप्प्यांमध्ये रूपये २१ कोटी मंजूर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस पन्नास वर्षे झाल्याबद्दल तत्कालिन राष्ट्रपतींनी या संस्थेला स्वायत्त संस्था म्हणून मान्यता देत एक उपकेंद्र नागपूर येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतला असुन यासाठी केंद्र शासनाच्यावतीने सन २०१४ मध्ये १० रुपये कोटी व सन २०१५ मध्ये रुपये ११ कोटी मंजूर केले असुन त्यातून बांधकामाचा खर्च होणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) होय.

(३) नागपूर येथे गोंडवाना संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे. तथापि यासाठी नागपूर येथे शासकीय जमीन अद्याप प्राप्त झालेली नाही. जमीन प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यवाही सुरु असून, जमीन प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात विमान निर्मिती प्रकल्पाबाबत

(४२) * ४१८९२ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात प्रथम विमानाची निर्मिती करणाऱ्या अमोल यादव या तरुणाला पालघर जिल्ह्यात जमीन दिल्याची घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मॅग्नेटिक महाराष्ट्र या गुंतवणूक परिषदेत अमोल यादव यांच्याबरोबर करारही केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमान निर्मितीच्या प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) नाही.

(२) मॅग्नेटिक महाराष्ट्र कॉव्हर्जन्स-२०१८ या औद्योगिक गुंतवणूक प्रदर्शन कार्यक्रमात श्री.अमोल यादव यांच्या विमान निर्मिती प्रकल्पाबाबत गुंतवणूक हेतू करार करण्यात आला आहे.

(३) प्रस्तुत प्रकल्प प्रत्यक्षात साकार करण्यासाठी घटकासमेवत पुढील पाठपुरावा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मराठा, कुणबी समाजासह बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी नेमण्यात आलेल्या सारथी समितीच्या शिफारशींबाबत

(४३) * ४१७४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा, कुणबी समाजासह बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी सर्वांगिण विकासासाठी विविध उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी) या समितीने दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री, मा.ऊर्जा मंत्री व मा.जलसंपदा मंत्री इत्यादींच्या उपस्थितीत आपला अहवाल मा.मुख्यमंत्री यांना सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे स्वरुप काय आहे व उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय.

(२) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचे स्वरुप, रचना व कार्यपध्दती, बोधचिन्ह, मुख्यालय, संस्थेंतर्गत विभाग, सारथी संस्थेचे पथदर्शी प्रकल्प व ते राबविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व अंदाजित खर्च या व इतर सर्व बाबींची तपशीलवार अहवाल, तसेच सदरची संस्था स्थापन करण्याच्या पूर्व तयारीसाठी शासनास मार्गदर्शन व शिफारशी सदर अहवालात करण्यात आलेल्या आहेत. सदर अहवालावरील कार्यवाही शासनाच्या विचारधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील दलित समाजातील विविध घटकांना कर्ज व अनुदान देण्याबाबत

(४४) * ४१९५८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दलित समाजातील विविध घटकांतील जातीना मुख्य प्रवाहात आणुन त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी ४० वर्षापूर्वी स्थापन केलेल्या महामंडळांतर्फे यापुढे कोणत्याही प्रकारचे कर्ज आणि अनुदान न देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातर्फे उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या कर्ज व अनुदान यांची वसुली होत नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे कर्ज न देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने दलित समाजातील या महामंडळाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या बेरोजगारांची यामुळे आर्थिक गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विविध शहारातील औद्योगिक वसाहतीमधील भूखंड बळकाविल्याबाबत

(४५) * ४१२३७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, जळगांव, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड इत्यादी औद्योगिक वसाहतीमधील भूखंड बळकावण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयात तांत्रिक कारणास्तव भूखंड वापराविना पडून, नाशिकमध्ये भूखंड बळकावणाऱ्या दलालांचे वाढते प्रमाण, नवी मुंबई औद्योगिक वसाहतीमध्ये सर्वाधिक अतिक्रमणे, जळगांव औद्योगिक वसाहतीत उद्योगाकरीता भूखंड घेऊन अन्य कारणास्तव वापर, पायाभूत सुविधांचा अभाव अशा अनेक समस्यांनी या औद्योगिक वसाहतीना ग्रासले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील औद्योगिक वसाहतीमधील समस्या दूर करण्याकरीता शासन कोणते विशेष प्रयत्न करीत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पुणे जिल्हयात तांत्रिक कारणास्तव भूखंड वापराविना पडून आहेत अशी कोणतीही वस्तुस्थिती नाही. नाशिक, सातपूर/अंबड औद्योगिक क्षेत्रातील भूखंड निविदा पध्दतीने वाटपाचे धोरण असल्याने भूखंड बळकाविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच नवी मुंबई औद्योगिक वसाहतीमध्ये अतिक्रमण झाले असून नियमाप्रमाणे काढण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच जळगांव औद्योगिक वसाहतीमध्ये भूखंड घेऊन अन्य कारणास्तव वापर होत असल्याची अशी वस्तुस्थिती आढळून आलेली नाही. जळगाव औद्योगिक वसाहत क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(३) औद्योगिक क्षेत्रातील समस्या दूर करणे तसेच पायाभूत सुविधा पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडील निधी विनावापर पडून असल्याबाबत

(४६) * ४१२२८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे सन २०१७-१८ चा दलित वस्तीचा २४ कोटी ३९ लाख व वैयक्तिक लाभाचा ६ कोटी असा एकूण ३०.३९ कोटींचा निधी शिल्लक असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासकिय निधी संबंधित योजनांवर खर्च न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) व (२) नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे सन २०१७-१८ चा दलित वस्ती विकास निधी जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ४ डिसेंबर, २०१७ च्या आदेशान्वये प्राप्त झाला असून दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी सदर रक्कम अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध झाली आहे. या अंतर्गत कामांना दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून प्राप्त निधी सर्व पंचायत समित्यांना वितरीत करण्यात आलेला आहे. यातील काही कामांना दिनांक १८ मे, २०१८ रोजी मान्यता देण्यात आलेली असून एक महिन्यात निधी वितरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळात गैरव्यवहार झाल्याबाबत

(४७) * ४१२८५ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या ३८५ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारा संबंधित नस्ती महामंडळाच्या कार्यालयाचे सील तोडून पळविण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ ते २०१५ या काळात महामंडळात कोटयवधी रुपयांचा झालेल्या गैरव्यवहारांच्या नस्तींचा पळविण्यात आलेल्या नस्तीमध्ये समावेश असून सदर प्रकरणी दहिसर (मुंबई) पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही, बोरीवली समाजकल्याण कार्यालयाच्या इमारतीत सन २००२ ते २०१५ या कालावधीत कार्यरत असलेले सदर महामंडळाचे कार्यालय प्रशासकीय इमारत, चेंबुर स्थलांतरीत करण्यात आलेले असुन, महामंडळातील गैरव्यवहारासंबंधिच्या सर्व नस्त्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने तपासकामी जप्त केलेल्या आहेत. सहायक आयुक्तांनी बोरीवली समाजकल्याण कार्यालयाच्या इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दारावरील सील केलेले कुलूप अज्ञात इसमांनी तोडल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर सदर घटनेबाबत दहिसर पोलीस ठाण्यात दिनांक ४/५/२०१८ रोजी गु.र.क्र. ३३०/२०१८ अन्वये तक्रार नोंदविण्यात आली आहे.

(२) अशी बाब नाही,

(३) पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यभरातील केंद्रातून खरेदी केलेल्या तूरीची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत

(४८) * ४२२९२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाफेडने राज्यभरातील १६७ केंद्रावरुन १६ लाख क्विंटल तूरीची खरेदी यावर्षी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने खरेदी केलेल्या तूरीची ८२४.४४ कोटींची देयके प्रलंबित असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असल्याने अदयाप खरेदी करण्यात आलेल्या तूरीचे ५५९ कोटींचे चुकारे न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधीची तरतूद करुन सदरहू शेतकऱ्यांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) सन २०१७-१८ मधील नाफेडच्यावतीने तूर खरेदीकरीता पणन महासंघामार्फत १६६ व विदर्भ पणन महासंघामार्फत २३ अशी एकूण १८९ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली आहेत दोन्ही संस्थाकडून दिनांक १५/०५/२०१८ अखेरपर्यंत एकूण ३३.६७ लाख क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.

(२) व (३) दिनांक २६/०४/२०१८ पर्यंत २५.६६ लाख क्विंटल तूर खरेदी करण्यात आली होती. सदर तूरीच्या खरेदीची रक्कम १३९८.५६ कोटी होती. त्यापैकी नाफेडकडून प्राप्त झालेल्या रुपये ८३६.२९ कोटी मधून दिनांक २६/०४/२०१८ पर्यंत ७६७.४१ कोटी शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहे.

दिनाक २५/०६/२०१८ पर्यंत एकूण १५५४ कोटींचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत.

त्याच बरोबर शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यासाठी बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यासाठी रुपये २०० कोटीची शासन हमी पणन महासंघास मंजूर करण्यात आली आहे. सदर शासन हमीवर बँकेकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औदयोगिक विकास क्षेत्रातील भूखंड औदयोगिक विकास महामंडळाने परत घेतल्याबाबत

(४९) * ४१८७९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उदयोग न उभारल्यामूळे विविध औदयोगिक विकास क्षेत्रात पडून असलेले ५४८ भूखंड औदयोगिक विकास महामंडळाने परत ताब्यात घेतले असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक तालुका मुख्यालयी औदयोगिक वसाहती थाटण्यात आल्या असुन जागोजागी एमआयडीसीचे फलक झळकतात, परंतू उदयोग नसतो, जिल्हा मुख्यालयी असलेल्या एमआयडीसीतच उदयोगांची प्रचंड वाणवा असुन तेथील भूखंड वर्षानुवर्षे उदयोगांच्या प्रतिक्षेत असल्याने एमआयडीसीची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी १६ प्रादेशिक कार्यालये असून त्या अंतर्गत ८३ हजार ९५३ औद्योगिक भूखंड असून प्रत्येक तालुका मुख्यालयी औद्योगिक वसाहती थाटण्यात आल्या मात्र दणवळणाच्या सोयी सुविधांचा अभावामुळे तेथे उद्योग उभारले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उद्योग उभारले गेले नाहीत अशा भुखंडधारकांना एमआयडीसीने नोटीस बजावून त्यांच्याकडील भुखंड परत घेतले त्यात सर्वाधिक अमरावती प्रादेशिक विभाग त्या खालोखाल नागपूर, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी या प्रादेशिक विभागांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त परत घेतले ते भुखंड आता नव्या इच्छुक उद्योजकांसाठी लिलाव केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

विहीत कालावधीमध्ये भूखंडाचा विकास केला नाही असे ५४८ भूखंड महामंडळाने परत घेतलेले आहेत.

(५) होय.

महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार भूखंडाचे वाटप करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणांची अमंलबजावणी करण्याबाबत

(५०) * ४१७४७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रविण दरेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)शासनाने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ रोजी जाहीर केलेल्या राज्याच्या ज्येष्ठांच्या धोरणांची अद्याप अंमलबजावणी केली नसल्याने व या धोरणाचा शासन निर्णय काढावा तसेच ज्येष्ठ नागरिकांची मर्यादा ६५ वरुन ६० करावी, महात्मा फुले जीवनदायी योजनेत जेष्ठांना समावेश, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र आयुक्तालय, मधुमेह रक्तदाबासाठी मोफत औषधे, श्रावणबाळ वार्धक्य निवृत्ती वेतनात वाढ आदि मागण्यांसाठी ज्येष्ठ नागरी संयुक्त कृती समितीच्यावतीने दिनांक ०२ मे, २०१८ रोजी मुंबईतील आझाद मैदान तसेच राज्यातील जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन १९९९ मध्ये ज्येष्ठ नागरिक धोरण जाहिर केले असुन सन २०००, २०११ तसेच दिनांक ३० सप्टेंबर,२०१५ मध्ये पुनर्रचनाही केली आहे, परंतू याकरीता आवश्यक आर्थिक निधीची तरतूद तसेच विविध योजनांची पुनर्रचना केली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या सुमारे दीड कोटी असून ज्येष्ठ नागरीकांच्या इतर कोणकोणत्या मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत व या मागण्या तातडीने मान्य करण्याबाबत शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत, तसेच या मागण्या मान्य न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे आहे
(२) आवश्यकतेनुसार तरतूद करण्यात येते.
(३) व (४) केंद्र शासनाप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांचे वय ६५ वरुन ६० करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून ज्येष्ठ नागरिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कासाजवळच्या घोळ-चिकनपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) गावात वीज पुरवठा सुरु करण्याबाबत

(५१) * ४२७६४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) कासाजवळच्या घोळ-चिकनपाड्यात सुमारे १०० कुटुंबे राहत असून या गावात आजतागायत वीज पोहोचली नसल्याचे माहे मे, २०१८ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार घोळ-चिकनपाड्यात वीज पुरवठा सुरु करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

कासाजवळच्या घोळ-चिकनपाड्यातील ३७ कुटुंबांना अद्यापपर्यंत वीज पुरवठा झालेला नाही.

(२) डहाणू तालुक्यातील कासाजवळच्या घोळ-चिकनपाड्याच्या विद्युतीकरणासाठी महावितरण कंपनीमार्फत निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला असून कामे प्रगतिपथावर आहेत. सदरची कामे नोव्हेंबर, २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील विद्युत समस्यांबाबत

(५२) * ४२०८१ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील जांभूळपाडा, नवघर, वऱ्हाड, गाठेमाळ, दांडकातकरवाडी आदि गावांमध्ये विद्युत वाहिन्या लोंबकळत असून अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर उघड्या स्थितीत आहेत तसेच अनेक गावांमध्ये विजेचे सडलेले पोल तग धरून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील अनेक ठिकाणी विद्युत वाहिन्या झाडाला लटकलेल्या असून काही ठिकाणी विद्युत वाहिन्या एकमेकांना स्पर्श होऊ नये म्हणून विद्युत वाहिन्यांना दगडाने दोरी लटकवून ठेवल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्युत वाहिन्या कधीही तुटण्याची शक्यता असल्याने तेथील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला असुन सदर ठिकाणची कामे तातडीने करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा, नवघर, वऱ्हाड, गाठेमाळ, दांडकातकरवाडी या गावांमध्ये उन्नतीकरण व आधुनिकीकरण (U&M) व देखभाल व दुरुस्ती (O&M) या

योजनेंतर्गत आजपर्यंत लघुदाब वाहिनीचे एकूण २१० गंजलेल्या खांबांपैकी ११५ खांब तसेच एकूण जिर्ण झालेल्या १२ किमी लघुदाब वाहिनीपैकी ६.३० किमी लघुदाब वाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. तसेच जिर्ण झालेले १३ डिस्ट्रीब्यूशन बॉक्स बदलण्यात आले आहेत.

(२) परंतु सन २०१७-१८ मध्ये पाली उपविभागांतर्गत सर्व गांवामध्ये विविध ठिकाणी लटकलेल्या वाहिन्यांना एकूण ४२९९ स्पेसर्स ठेकेदारामार्फत योग्य त्या अंतरावर लावण्यात आलेले आहेत.

(३) सदर गावांमध्ये उन्नतीकरण व आधुनिकीकरण (U&M) व देखभाल व दुरुस्ती (O&M) या योजनेंतर्गत एकूण जिर्ण झालेल्या १२ किमी लघुदाब वाहिनीपैकी ६.३० किमी लघुदाब वाहिन्या महावितरण कंपनीमार्फत बदलण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरित गंजलेले विद्युत खांब व जिर्ण विद्युत वाहिन्या बदलण्याचे काम पंडीत दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे.

तसेच विभागीयस्तरावर गंजलेले खांब व विद्युत वाहिनीचे संचलन व सुव्यवस्थेकरीता कंत्राटदारास कार्यादेश (O&M) दिनांक १३/६/२०१८ रोजी देण्यात आला आहे. सदर निविदे अंतर्गत अंदाजे ६० खांब व ३ किमी वाहिनी बदलण्याचे काम प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रियंका ग्रामीण विकास संस्था शिवणी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) संस्थेच्या वसतिगृहाचे इमारत भाडे थकविल्याबाबत

(५३) * ४३७५५ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील प्रियंका ग्रामीण विकास संस्था शिवणी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) या संस्थेला मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहाचे इमारत भाडे शासनाने ५ वर्षापासून थकविल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात इतर जिल्ह्यात हेच भाडे ७५ % देय असतांना जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून संस्था चालकांना नाहक त्रास देत असुन याबाबत आयुक्त पुणे कार्यालयाने सदर अधिकाऱ्यास नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचे दिनांक १६ मार्च, १९९८ रोजीचे स्पष्ट आदेश असतानाही इमारत भाडे प्रलंबित असल्याचे प्रमुख कारणे काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार संस्था चालकास इमारत भाडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त भाडे देण्यास निष्काळजीपणा करणाऱ्या जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.

(२) नाही.

यासंदर्भात जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने त्यांनी केलेला खुलासा संयुक्तिक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) संबंधित संस्थेने सन २०१३ ते २०१७ या वर्षाचे भाडे प्रस्ताव दिनांक २१/०१/२०१८ रोजी सादर केलेले असून, सदर प्रस्ताव संस्थेच्या स्तरावर प्रलंबित होते.

(४) प्रलंबित इमारत भाडे अदा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत असून, जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात हजारो लिटर रसायन मिश्रीत ताडीची विक्री होत असल्याबाबत

(५४) * ४३४५७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात हजारो लिटर रसायन मिश्रीत ताडीची विक्री होत असल्याचा प्रकार माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रसायन मिश्रीत ताडीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असतानाही याकडे पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भेसळयुक्त ताडी विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय.

(२) हे खरे नाही. पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचेमार्फत वेळोवेळी कार्यवाही करून अवैध ताडी विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच शेजारील तेलंगणा राज्यातुन येणाऱ्या अवैध ताडी व मद्य रोखण्यासाठी सीमालगतच्या भागात वेळोवेळी वाहनाची तपासणी केली जाते व रात्रीच्या वेळी गस्त देखील घालण्यात येते.

(३) बिलोली तालुका तसेच आजुबाजूच्या परिसरात अवैध ताडीची विक्री रोखण्यासाठी,

अ) राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत माहे एप्रिल व मे, २०१८ या कालावधीत एकुण २६ गुन्हे नोंदविले असून २८७८ लिटर अवैध ताडी जप्त करण्यात आली आहे. सदर कारवाई मध्ये एकुण ८८,४९०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ९३ अन्वये ३ ताडी विक्रेत्या सराईत गुन्हेगारांविरूध्द कारवाई करण्यात येत आहे.

ब) पोलीस विभागामार्फत माहे एप्रिल व मे, २०१८ या कालावधीत एकुण ३७ गुन्हे नोंदविले आहेत. सदर कारवाई मध्ये एकुण ३८,२६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील अडत बाजार हमाल संघाच्या प्रारुप यादीत बोगस नावे दाखल केल्याबाबत

(५५) * ४२६६९ प्रा.डॉ.तानाजी सावंत : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील सहकारी तत्वावरील बाजार समितीच्या हमाल-तोलार गटाच्या प्रसिध्द झालेल्या प्रारुप यादीत ४१२ बोगस नावाचा समावेश असल्याचा आरोप करीत बार्शी अडत बाजार हमाल संघाने दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास एक दिवस धरणे आंदोलन करुन निषेध नोंदविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षापासून २०० व्यक्ती हमालीचे काम करत असताना त्यांची नावे वगळून कधीही हमालीचे काम न केलेल्या अनेकाचा या यादीत समावेश करण्यात आल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन बोगस नावे कमी करण्यात यावीत अशी मागणी केली असुन एक दिवशीय धरणे आंदोलन केल्यामुळे हमाल-तोलार बांधव कामावर उपस्थित न राहिल्याने सौदे झाले नाहीत व बाजार बंद राहीला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार बोगस नावे दाखल करणाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १७/०४/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या हमाल-तोलार मतदार संघाच्या मतदार यादीमधील सुमारे ५५० ते ६०० खोटी व बोगस नावे अंतिम मतदार यादीतून कमी करणेबाबत हरकत प्राप्त झाली होती त्यानुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी दिनांक ३१/१२/२०१७ पूर्वी ज्यांनी अनुज्ञप्ती (लायसन्स) धारण केलेली आहेत असे हमाल व तोलार यांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यास पात्र ठरणार आहेत असे निश्चित केल्यानंतर प्राप्त हरकत अर्जानुसार १४ नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याविषयी आदेशित करून दिनांक १४/५/२०१८ च्या आदेशान्वये हरकत अर्ज नामंजूर केला आहे.

दिनांक ५ मे, २०१८ रोजी हमाल संघाने केलेल्या आंदोलनाच्या काळात दुपार नंतर बाजारामधील व्यवहार सुरळीतपणे चालू राहिले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील दलित वस्ती विकास योजनेतील कामे पुर्ण करण्याबाबत

(५६) * ४३०६४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील दलित वस्ती विकास योजनेतील ४१८ कामांपैकी १२७ कामे अपूर्ण असल्याची बाब माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामे पुर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेने निधी देवूनही अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यानुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) कामे अपूर्ण राहण्यास जबाबदार असलेल्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात गोदामे उपलब्ध नसल्यामुळे हरभऱ्याची खरेदी प्रलंबित असल्याबाबत

(५७) * ४१२२६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हमीभावाने हरभऱ्याची खरेदी सुरु करण्यात आली असुन बाजार हस्तक्षेप योजनेमधून खरेदी केलेल्या तूरीच्या भरडाईस विलंब होवून तूर गोदामात विनावापर पडून असल्यामुळे हरभऱ्याची खरेदी प्रलंबित असल्याचे दिनांक १ मार्च, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तूर भरडाई तातडीने पूर्णत्वास नेवून गोदामे मोकळी करुन बाजार समित्यांकडील गोदामे ताब्यात घेवून हरभऱ्याच्या खरेदीस गती द्यावी अशी मागणी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) राज्य शासनाने खरेदी केलेल्या तूरीची भरडाई करुन राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत रुपये ५५/- प्रति किलो दराने तूरडाळीचा पुरवठा करण्यात येत आहे.

राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत हरभरा खरेदी दिंनाक १/०३/२०१८ पासून सुरु करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) तूर व हरभरा साठवणूकीसाठी अतिरिक्त २११ गोदामे भाडेतत्वावर घेतली आहेत तसेच परिवहन विभागाची आंतरराज्य सीमेवरील ताब्यात असलेली गोदामे, जलसंपदा विभागाची रिकामी गोदामे, कृषी उत्पन्न बाजार समितीची गोदामे, कापूस पणन महासंघाची, पणन महासंघाची व बंद साखर कारखान्याची गोदामे साठवणूकीसाठी आवश्यक त्यादुरुस्ती करुन अधिग्रहीत करण्याच्या सूचना राज्य वखार महामंडळ व संबंधित विभागांना दिलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याबाहेर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची फ्री-शिप रोखण्याबाबत

(५८) * ४३३८७ श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षणासाठी बाहेर राज्यात संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी फ्रीशिप शासनाकडून रद्द करण्यात आल्याने नागपूर जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी फ्री-शिपपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थी यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फ्री-शिप देण्यात येत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता येत होते. बाहेर राज्यात उच्च शिक्षणासाठी नंबर लागलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून फ्री-शिप देण्यात येत असल्यामुळे गरीब विदयार्थ्यांचा मोठा फायदा होत होता मात्र शासनाने मागील वर्षापासून फ्रीशिपची सवलत बंद केल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.
(२) व (३) नाही, इतर राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्याच्या फ्रि-शिप योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. परंतु, पर राज्यात/देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी निवडक शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या व रुपये ६.०० लाखापर्यंत कुटुंबाची उत्पन्न मर्यादा असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० विद्यार्थ्यांना निवडक अभ्यासक्रमांसाठी राजर्षी शाहू महाराज देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोखाडा (जि.पालघर) येथील ११ पाड्यांत वीज पुरवठा नसल्याबाबत

(५९) * ४१९१० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गावपाड्यांतील तब्बल ११ पाडे कोलेधव, वांगणपाडा, चिकाडीचापाडा, जांभळीचा पाडा, रुईचा पाडा, तुळयाची वाडी, जंगलवाडी, वंगनपाडा, पोऱ्याचा पाडा, बरीरोबावी वाडी आणि गणेशवाडी इत्यादी पाड्यामध्ये अद्यापी वीज पुरवठा केला नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, शासनाने राबविलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्युतीकरण योजना तसेच सौभाग्य योजनाही फोल ठरल्या असून तेथील ग्रामस्थांना तसेच विद्यार्थ्यांनाही पणतीच्या दिव्यात आपले दैनंदिन कार्य पार पाडावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील आदिवासी खेड्यापाड्यांमधील विद्युतीकरणासाठी तब्बल ४५३ कोटी रूपये मंजूर झाल्याची माहिती तेथील लोकप्रतिनिधींनी प्रसारमाध्यमांना दिली असून, त्या योजनेतून किती गावे व खेडे उजळली आहेत याची माहिती अद्यापही तेथील सर्वसामान्य नागरीकांना मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त पाड्यांमध्ये तात्काळ वीज पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मोखाडा तालुक्यामध्ये २५३ वाडीपाडे असून त्यापैकी २३८ वाडीपाड्यांचे विद्युतीकरण झालेले आहे व उर्वरित १५ वाडीपाड्यापैकी १३ वाडीपाडे महावितरणकडून व २ वाडीपाड्यांचे विद्युतीकरण महाऊर्जामार्फत प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी येथील एच-एनर्जी गॅस प्रकल्पामुळे दाभोळ प्रकल्पातून होणाऱ्या बारमाही वीज निर्मितीबाबत

(६०) * ४१७४५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरानंदानी समुहातील एच-एनर्जी गेटवे या कंपनीतर्फे (जि.रत्नागिरी) जयगड येथे उभारण्यात आलेल्या नैसर्गिक वायू प्रकल्पामुळे दाभोळ येथील वीज निर्मिती प्रकल्पाला नैसर्गिक वायूचा नियमित पुरवठा होऊन तेथे

बारमाही वीजनिर्मित होणार असून या प्रकल्पाचे उद्घाटन दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व यासाठी राज्य शासनाकडून काही गुंतवणूक करण्यात येणार असल्यास त्याचे प्रमाण किती असणार आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पातून किती वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे, त्याचे वितरण कशा प्रकारे होणार आहे व महाराष्ट्र राज्याला किती वीज पुरवठा होणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हिरानंदानी समुहातील एच-एनर्जी गेटवे या कंपनीतर्फे नैसर्गिक वायू प्रकल्पाच्या फ्लोटींग टर्मिनलचे उदघाटन दिनांक १ मे, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे हस्ते झाले आहे. परंतु दाभोळ येथील रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड समवेत नैसर्गिक वायू पुरविण्याबाबत कोणताही करार झालेला नाही.

(२) सदर प्रकल्पामध्ये जयगड, जि.रत्नागिरी येथे जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. यांनी निर्माण केलेल्या बंदरामध्ये, लिक्विफाईड नॅचरल गॅस (LNG) घेऊन येणारे जहाज हाताळण्यासाठी जेट्टी व Floating Storage and Regasification Unit (FSRU) असणार आहे. जहाजातून आणलेले एलएनजी FSRU मध्ये नेऊन त्याचे Regasification करण्यात येणार आहे व नंतर तो गॅस जयगड खाडीतून टाकण्यात येणाऱ्या पाईपलाईनमधून दाभोळ येथील गॅस ऑथोरिटी ऑफ इंडिया (GAIL) यांच्या नॅशनल ग्रीड मध्ये नेण्यात येणार आहे. ह्या प्रकल्पामध्ये संपूर्ण गुंतवणूक जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट व हिरानंदानी समूहाच्या एच-एनर्जी गेटवे प्रा. लि. ह्या खाजगी विकासकांकडून करण्यात येणार असून, राज्य शासनाकडून कोणतीही गुंतवणूक करण्यात येणार नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत आर्थिक विकास महामंडळांच्या एकत्रिकरणाबाबत

(६१) * ४१९६४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या ६ पैकी ३ आर्थिक विकास महामंडळांना एकत्रित आणण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००२ साली ६ आर्थिक विकास महामंडळे एकत्रिकरण करण्याचा प्रयत्न केला असता त्यास मोठ्या प्रमाणात विरोध झाला असल्याने तो मागे घ्यावा लागला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या महामंडळाचे कार्यस्वरुप व रुपरेषा काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१), (२) व (३) नाही, वित्त विभागाच्या निर्देशानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त ४ महामंडळाची पुनर्रचना व या महामंडळातील योजनांच्या परिणामांचे मुल्यमापन करुन योजनांमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याबाबत आढावा घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोयाबीन, एरंडी, सूर्यफुल, तांदळाचा कोंडा व शेंगदाणा यापासून खाद्यतेल तयार झाल्यानंतर उरलेल्या पेंढच्या निर्यातीत घट झाल्याबाबत

(६२) * ४१३३८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षात सोयाबीन, एरंडी, सूर्यफुल, तांदळाचा कोंडा व शेंगदाणा यापासून खाद्यतेल तयार झाल्यानंतर उरलेल्या पेंढच्या निर्यातीत सुमारे ३५ टक्के घट झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सोयाबीनच्या पेंढीला दक्षिण अमेरिकेतून मोठ्या प्रमाणात मागणी असुन सदरहू उत्पादनात घट झाल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१), (२) व (३) पणन विभागाच्या शेतकऱ्यांनी पिकविलेल्या कृषी शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था करण्याकरिता संबंध येतो. कृषी उत्पादीत मालावर प्रक्रिया करुन तयार झालेल्या मालाच्या निर्यातीशी पणन विभागाचा संबंध येत नाही. आयात निर्यातीचे धोरण केंद्र शासनामार्फत ठरविले जाते. खाद्यतेल उत्पादनानंतर तयार झालेल्या पेंढच्या निर्यातीत घट झाल्याचा प्रश्न केंद्र शासनाच्या निर्यात धोरणाशी संबंधित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सुसरवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याबाबत

(६३) * ४१२९१ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुसरवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सडके अन्न दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळेच्या स्वयंपाक घरात साठा करून ठेवलेल्या मूग, मटकी, वाटाणे, उडीद डाळ व तूर डाळीला कीड लागली असून त्याचाच वापर रोज जेवण्यासाठी केला जात असल्याने आश्रमशाळेत शिकणाऱ्या सुमारे सहाशे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२) व (३) यासंदर्भात दिनांक २४/०४/२०१८ रोजी दैनिक 'सामना' या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर आश्रमशाळेचे सत्र दिनांक १३/०४/२०१८ रोजी संपलेले होते. सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये बातमीमधील वस्तुस्थिती आढळली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपात सोलापूर जिल्हा राज्यात विसाव्या क्रमांकावर असल्याबाबत

(६४) * ४२६७१ प्रा.डॉ.तानाजी सावंत : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीमुळे वारंवार होणारे पिकांचे नुकसान आणि शेतमालाचे गडगडलेले भाव यांचा सामना करतांना खाजगी सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याकरीता राज्यातील सहकारी, खाजगी, ग्रामीण व राष्ट्रीयकृत बँकांच्या उदासीनतेमुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्याच्या तुलनेत कमी कर्ज उपलब्ध होत असून सोलापूर जिल्हा २० व्या क्रमांकावर असल्याची बाब दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात कर्ज वाटप होण्याकरीता शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.

(२) व (३) सोलापूर जिल्ह्यात तालुका/गाव पातळीवर राष्ट्रीयकृत/खाजगी बँका, ग्रामिण बँका व सहकार विभाग कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने पात्र शेतकऱ्यांचे कर्ज मेळावे घेवून कर्ज मागणी अर्ज भरुन घेणे व कागदपत्राची पुर्तता करुन कर्ज मंजूरी करुन तातडीने पत पुरवठा करणे यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून सूचना निर्गमित करण्यात आल्या, त्यानुषंगाने जिल्ह्यामध्ये १०७ मेळावे घेण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यासाठी खरीप २०१८ चे उद्दीष्ट रुपये १३८७ कोटीपैकी दिनांक ३०/०६/२०१८ अखेर सुमारे ४०,००० खातेदारांना रुपये ४६१ कोटी (३३%) पीक कर्ज वाटप झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.